म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : व्रा.वा.
दा.क्र. : २०७८

# सुभाषबाबू निसटले



BVBK-0402077

श्रीपाद केळकर

वाचनालय शाखा

२०७७
१२।१२।८७

सं. ठाणे, ...नालय शाखा.

क्र. २०७७ दिनांक १२.१२.८७

विषय पा. वा. क्र. ........

स्वातंत्र्य कथा माला : ३

# सुभाषबाबू निसटले

BVBK-0402077

श्रीपाद केळकर

रचना समवाय प्रकाशन, पुणे

प्रकाशक :
गोपाळ मोकाशी
सचिव, रचना समवाय
द्वारा अक्षर भांडार,
९६८, सदाशिव पेठ,
उंबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रस्ता
पुणे-४११ ०३०.

□

प्रथमावृत्ति : १९८७

□


मुद्रक :
संजीव देशपांडे
अक्षरमुद्रा
१३६०, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

□

© प्रकाशकाधीन

□

स्वातंत्र्य कथा माला : ३



म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २०५५ दिनांक
विभाग बा.वा. क्र. . . . . . .

# बिनचूक योजना

१९४० च्या डिसेंबरमधील ते दिवस. गुलाबी थंडी पडली होती. कलकत्त्यातील प्रतिवर्षी येणारा तो सुखद मोसम होता. नेताजी सुभाष नुकतेच तुरुंगातून सुटून आले होते. त्यांची तब्बेत अजून सुधारली नव्हती. अंथरूणावर पडूनच असत.

एक दिवस नेताजींनी आपला पुतण्या शिशिर याला बोलावून घेतले. म्हणाले, "माझ्याजवळ बस." पण शिशिर नेताजींच्या पलंगाजवळ काहीसा दूर अंग चोरून बसला. नेताजी त्याला म्हणाले,

"हे बघ शिशिर, मॉस्को रेडियो रोज ऐकत जा. विशेषत: आपल्या देशांतल्या घडामोडी, तसंच स्वातंत्र्य आंदोलनासंबंधीच्या बातम्या आणि टीकाटिप्पणी नीट ऐक आणि मला व्यवस्थित सांग. लक्षात आलं ना, मी काय म्हणतोय ते !"

त्या दिवसात आजारी नेताजींजवळ शिशिर तास न् तास बसत असे. काकांच्यात काही तरी बदल होतोय असे शिशिरला नेहमी जाणवायचे. त्यांच्या डोळ्यांत क्रांतीचे तेज धगधगत होते.

नेताजी तुरुंगात असताना शिशिर वगैरे त्यांना भेटायला जायचे. भेटीच्या वेळी तुरुंगाचे गोरे अधिकारी हजर असायचे. नेताजी त्यांचेकडे पाहून त्यांना गंमतीने म्हणत, "तुमच्या साम्राज्याचा अंत आता अगदी जवळ आलाय. त्यानंतर काय होईल माहीत आहे? मग तुम्हा लोकांना कैद्यांच्या रांगेत उभं राहावं लागेल आणि आमचे लोक तुमच्या खुर्चीत बसलेले असतील."

नेताजींच्या त्या गंमतीशीर बोलण्याची सगळ्यांना मोठी मजा वाटायची. शिशिरचे वडिल व नेताजींचे थोरले बंधु शरत्‌बाबू नियमितपणे नेताजींना भेटायला तुरुंगात जात. अशाच एका भेटीत नेताजी शरद्‌बाबूंना म्हणाले

"तुम्ही ऑक्टोबरात पूजेच्या सुट्टीत उत्तर भारतात विश्रांतीसाठी जाणार असालच. त्यावेळी माझं एक काम कराल का? वायव्य सरहद्द प्रांतातील फॉरवर्ड ब्लॉकचे मियाँ अकबर शहा यांना बोलावून घ्या आणि रशियाला जा असा माझा निरोप त्यांना सांगा."

सरहद्द प्रांतातून जमिनीच्या मार्गाने रशियाला जावयास रस्ता आहे आणि मियाँसाहेब पूर्वी त्या रस्त्याने गेले असल्याने त्यांना त्याचा अनुभवही आहे असे नंतर शिशिरला त्याच्या वडिलांनी सांगितले.

नेताजींनी १९४० च्या २९ नोव्हेंबरला तुरुंगात उपोषण सुरू केले. उपोषणाच्या ७ व्या दिवशी ५ डिसेंबरला आजारी अवस्थे-

तच त्यांना सोडले. एका रुग्णवाहिकेतून त्या दिवशी दुपारी ते कलकत्त्याच्या ३८/२ एल्जिन रोडवरील आपल्या निवासस्थानी आले.

नेताजींना कमालीचा अशक्तपणा आलेला होता. चेहरा फिकट आणि थकलेला दिसत होता. सबंध दिवस ते पलंगावर पडूनअसत. नेताजींनी तुरुंगात थोडयाशा मिशा वाढविल्या होत्या. त्यामुळे तर त्यांची चर्या अधिकच क्लान्त वाटायची.

शिशिर नेताजींकडे गेला की ते त्याला विचारीत, "हं ! कसा काय चाललाय तुझा अभ्यास ? तुझा सर्व दिवसाचा काय कार्यक्रम असतो ?"

शिशिर त्यावेळी वैद्यकीय महाविद्यालयात शिकत होता. नेताजी या आपल्या पुतण्याची आस्थेने आणि बारकाईने चौकशी करीत.

एल्जिन रोडवरचे बोस कुटुंबाचे घर जुने होते. वाडवडिल तेथेच रहात आलेले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस याच घरात लहानाचे मोठे झाले. सुभाषबाबूंच्या वडील भावाचे शरत्‌बाबूंचे दुसरे एक घर वुडबर्न पार्क रस्त्यावर होते. शिशिर तेथेच रहात होता. दोन्ही घरात फक्त तीन चार मिनिटांचे अंतर होते.

नेताजी सुटून आल्याला आठ एक दिवस झाले असतील. शिशिरला एक दिवस त्यांचा निरोप आला, "आज संध्याकाळी भेटायला ये."

त्याप्रमाणे शिशिर सायंकाळी नेताजींकडे गेला. ते शिशिरची वाटच पहात होते. शिशिर त्यांच्या खोलीत गेल्यावर सुभाषबाबूंनी इतर लोकांना बाहेर जायला सांगितले. आता खोलीत चुलते-पुतणे दोघेच उरले.

त्या दिवसात आजारी नेताजींजवळ शिशिर तास न् तास बसत असे. काकांच्यात काही तरी बदल होतोय असे शिशिरला नेहमी जाणवायचे. त्यांच्या डोळ्यांत क्रांतीचे तेज धगधगत होते.

नेताजी तुरुंगात असताना शिशिर वगैरे त्यांना भेटायला जायचे. भेटीच्या वेळी तुरुंगाचे गोरे अधिकारी हजर असायचे. नेताजी त्यांचेकडे पाहून त्यांना गंमतीने म्हणत, "तुमच्या साम्राज्याचा अंत आता अगदी जवळ आलाय. त्यानंतर काय होईल माहीत आहे? मग तुम्हा लोकांना कैद्यांच्या रांगेत उभं राहावं लागेल आणि आमचे लोक तुमच्या खुर्चीत बसलेले असतील."

नेताजींच्या त्या गंमतीशीर बोलण्याची सगळ्यांना मोठी मजा वाटायची. शिशिरचे वडिल व नेताजीचे थोरले बंधु शरत्बाबू नियमितपणे नेताजींना भेटायला तुरुंगात जात. अशाच एका भेटीत नेताजी शरद्बाबूंना म्हणाले

"तुम्ही ऑक्टोबरात पूजेच्या सुट्टीत उत्तर भारतात विश्रांतीसाठी जाणार असालच. त्यावेळी माझं एक काम कराल का? वायव्य सरहद्द प्रांतातील फॉरवर्ड ब्लॉकचे मियाँ अकबर शहा यांना बोलावून घ्या आणि रशियाला जा असा माझा निरोप त्यांना सांगा."

सरहद्द प्रांतातून जमिनीच्या मार्गाने रशियाला जावयास रस्ता आहे आणि मियाँसाहेब पूर्वी त्या रस्त्याने गेले असल्याने त्यांना त्याचा अनुभवही आहे असे नंतर शिशिरला त्याच्या वडिलांनी सांगितले.

नेताजींनी १९४० च्या २९ नोव्हेंबरला तुरुंगात उपोषण सुरू केले. उपोषणाच्या ७ व्या दिवशी ५ डिसेंबरला आजारी अवस्थे-

तच त्यांना सोडले. एका रुग्णवाहिकेतून त्या दिवशी दुपारी ते कलकत्त्याच्या ३८/२ एल्जिन ,रोडवरील आपल्या निवासस्थानीं आले.

नेताजींना कमालीचा अशक्तपणा आलेला होता. चेहरा फिकट आणि थकलेला दिसत होता. सबंध दिवस ते पलंगावर पडूनअसत. नेताजींनी तुरुंगात थोड्याशा मिशा वाढविल्या होत्या. त्यामुळे तर त्यांची चर्या अधिकच क्लान्त वाटायची.

शिशिर नेताजींकडे गेला की ते त्याला विचारीत, "हं ! कसा काय चाललाय तुझा अभ्यास ? तुझा सर्व दिवसाचा काय कार्यक्रम असतो ?"

शिशिर त्यावेळी वैद्यकीय महाविद्यालयात शिकत होता. नेताजी या आपल्या पुतण्याची आस्थेने आणि बारकाईने चौकशी करीत.

एल्जिन रोडवरचे बोस कुटुंबाचे घर जुने होते. वाडवडिल तेथेच रहात आलेले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस याच घरात लहानाचे मोठे झाले. सुभाषबाबूंच्या वडील भावाचे शरत्‌बाबूंचे दुसरे एक घर वुडबर्न पार्क रस्त्यावर होते. शिशिर तेथेच रहात होता. दोन्ही घरात फक्त तीन चार मिनिटांचे अंतर होते.

नेताजी सुटून आल्याला आठ एक दिवस झाले असतील. शिशिरला एक दिवस त्यांचा निरोप आला, "आज संध्याकाळी भेटायला ये."

त्याप्रमाणे शिशिर सायंकाळी नेताजींकडे गेला. ते शिशिरची वाटच पहात होते. शिशिर त्यांच्या खोलीत गेल्यावर सुभाषबाबूंनी इतर लोकांना बाहेर जायला सांगितले. आता खोलीत चुलते-पुतणे दोघेच उरले.

नेताजींचा चेहरा पांढरा फटफटीत आणि शरीर क्षीण झालेले होते. तरी देखील चेहऱ्यावर एक प्रकारची प्रफुल्लता शिशिरला जाणवली. गालावर व हनुवटीवर थोडीशी दाढी मात्र वाढली होती. ती काहीशी विचित्र वाटत होती.

नेताजींनी शिशिरला खाटेवर येऊन बसायची खूण केली. तो नेहमीसारखा बुजून दूर बसला. नेताजींनी त्याला जवळ येऊन बस असे म्हटले. काही न बोलता ते शिशिरकडे नजर रोखून एकटक पाहात राह्यले. मग शांत आणि हळू आवाजात विचारले, " शिशिर, बेटा, माझं एक काम करशील ? "

शिशिर काहीसा गडबडला. त्याने अनिश्चयाने मान हलवली.

नेताजींनी पुढे विचारले,

"तुला मोटार चालवता येते ? "

" हो, बऱ्यापैकी चालवतो."

" तूं कधी खूप दूरच्या प्रवासात स्वत: मोटार चालवली आहेस ? "

" नाही. "

नेताजी थोडेसे थांबले. पुन्हा म्हणाले, " बरद्वान किंवा त्यासारख्याच लांबच्या ठिकाणी मला केव्हा तरी एखाद्या रात्री मोटारनं घेऊन जाशील ? मात्र ही गोष्ट गुप्त ठेवायची बरं का ? कोणालाही पत्ता लागता कामा नये. जमेल तुला ? "

शिशिर मानेनेच ' हो ' म्हणाला.

मग नेताजी पुढे म्हणाले,

" या प्रवासाची आखणी अगदी काटेकोरपणे करायची. योजना कशी बिनचूक असली पाहिजे. तिची वाच्यता एका शब्दानेही होता कामा नये."

अंमळ थांबून नेताजी पुढे म्हणाले, " फक्त इलाला मी विश्वासात घेऊन सांगितलं आहे. तिची मी परीक्षा घेतलीय. तिच्यावर संपूर्ण विश्वास ठेवायला हरकत नाही."

इला ही शिशिरची चुलत बहीण. शिशिरपेक्षा दोन वर्षांनी लहानच.

नेताजींना एवढा कुठला लांबचा प्रवास करायचा असेल बरे ? शिशिर विचार करूं लागला. नेताजींना बहुधा कुठल्या तरी माणसाला किंवा लोकांना गुप्तपणे भेटायचे असावे असा शिशिरने अंदाज बांधला. आणि त्या भेटीच्या कुठल्या तरी गुप्त जागी घेऊन जायला ते आपणांस सांगत असावेत असे त्याला वाटले.

नेताजींचा निरोप घेऊन शिशिर जावयास निघाला तेव्हा त्यांनी त्याला म्हटले, " हे बघ, घरी जाऊन आपल्या या योजनेचा सर्व बाजूंनी विचार कर आणि उद्या सायंकाळी येऊन तुझी पक्की योजना मला सांग. "

दुसऱ्या दिवशी शिशिर नेताजींकडे गेला आणि त्यांच्या योजनेविषयी त्याने काय विचार केला आहे ते त्यांना सांगितले.

त्यानंतर कितीतरी दिवस नेताजी आणि शिशिर त्या योजनेविषयी तास न् तास बोलत असत. खोलीचे दार बंद करून दोघांची चर्चा चाले.

शिशिर आता रोज नेताजींच्या एल्जिन रोडवरच्या निवासस्थानीं त्यांना भेटायला जाऊ लागला. तो रोजच्या रोज कशाला भेटायला येतो असा घरातल्या इतर कुणाला संशय येऊ नये याची काळजी अर्थात्च नेताजींनी आधीपासूनच घेतली होती. ते आपण होऊन घरातल्यांना सांगत असत, " शिशिरला रेडियो कसा

लावायचा हे चांगलं माहीत आहे. मी त्याला रेडियोवरची परदेशी स्टेशने लावायला सांगतो."

आणि खरोखरच नेताजी रोज शिशिरला बर्लीन, रोम, लंडन, मॉस्को इत्यादि स्टेशने लावायला सांगायचे आणि त्या स्टेशनां-वरील बातम्या व टीकाटिप्पण्या तासन् तास ऐकत रहायचे. त्यावेळी युरोपात महायुद्ध सुरू होते. ब्रिटिशांनी लढाईत कुठे मार खाल्ल्याची किंवा त्यांचे डावपेच निष्फळ झाल्याची बातमी रेडियोवर ऐकली की नेताजी खूप आनंदित होत.

एक दिवस चुलत्या-पुतण्यांची गुप्त चर्चा चालू असताना नेताजींनी शिशिरला हलक्या आवाजात विचारले,

"शिशिर, मी जे काम तुला करायला सांगणार आहे ते तू तुझ्या आई-बाबांना देखील सांगता कामा नयेस. जमेल ना तुला ?'

"ठीक आहे. नाही सांगणार !"

थोड्याच दिवसांनी शिशिरचे वडिल शरत्‌बाबू सुट्टीसाठी कालिपाँगला गेले तर आई शिशिरच्या थोरल्या भावाकडे बरारीला नातवंडांना घेऊन गेली.

आपण ठरविले आहे त्या गोष्टीला शरत्‌बाबूंचा पाठिंबा मिळेल का ? नेताजी विचार करीत होते. सुभाषबाबूंची प्रकृती त्यावेळी अगदी खराब झालेली होती. त्या अवस्थेत असले भयंकर धाडस करू नये असेच शरत्‌बाबू आपणास सांगतील असे नेताजींना वाटले.

शरत्‌बाबू कालिपाँगला असताना नेताजी त्यांच्याशी गुप्त पत्रांद्वारे विचारविनिमय करीत होते.

काही दिवसांनी सुटी संपवून शरत्‌बाबू परत कलकत्त्याला आले. तो वेळ पावेतो घरातून निसटण्याची नेताजींची पूर्वतयारी बरीच पूर्ण होत आली होती.

शरत्‌बाबूंना नेताजींच्या योजनेविषयी शिशिरने काही सांगण्याचा प्रश्नच उद्‌भवला नव्हता. कारण नेताजींनी स्वतःच सर्व काही आपल्या भावाला सांगितले होते. शिशिरच्या आईलाही सर्व कळले होते.

नेताजींच्या साहसी योजनेत शिशिर सामिल झाला आहे आणि त्यामुळे त्याच्यावर काय प्रसंग ओढवेल याची शरत्‌बाबूंना किंवा त्यांच्या पत्नीलाही फारशी चिंता वाटत नसावी. शिशिरला तरी तसे काही जाणवले नाही. मात्र त्यांना एकूणच योजनेविषयी काळजी वाटत असावी हे मात्र लक्षात आले. ती योजना यशस्वीपणे पार पडेल असे त्यांना बहुदा वाटत नसावे.

लवकरच नेताजींनी आपल्या संकल्पित प्रवासाची शिशिरला बरीचशी कल्पना दिली. नेताजी वेषांतर करून प्रवास करणार होते. प्रवासाला निघण्याची तारीख अद्याप निश्चित केली नव्हती. कारण त्या तारखेसाठी वायव्य सरहद्द प्रांतातून निरोप यावयास हवा होता. आणि त्या निरोपाचीच नेताजी वाट पहात होते.


आता पहिला प्रश्न उभा राहिला तो नेताजी राहात होते त्या एल्जिन रोड वरील घरातून बाहेर कसे पडावयाचे ? कारण तेथून बिनबोभाट निसटता आले तरच पुढील बेत पार पडणार होता.

पोलिसांना संशय येऊ न देता एल्जिन रोडवरच्या घरातून बाहेर कसे पडायचे याचीच बारकाईने चर्चा सुरू झाली.

नेताजी व शिशिर याबाबत चर्चा करीत असताना अनेक कल्पना

निघाल्या. एक कल्पना अशी की त्यांना बरद्वानला किंवा आसन-सोलला जायचे होते तर त्यासाठी ग्रँड ट्रंक रोडपर्यंत आधी सुरक्षित-पणे पोचले पाहिजे. त्या करता प्रथम नेताजींनी त्याच रस्त्यावर असलेल्या शरत्‌बाबूंच्या वुडबर्न पार्कमधील घरात येऊन राहावे. तेथील हवा अधिक चांगली आहे. हवा पालटायला म्हणून नेताजी तिथे रहावयास गेले आहेत अशी बतावणी करावी.

पण विचारान्ती ही कल्पना सोडून द्यावी लागली. कारण त्या-मुळे नेताजींची प्रकृती आता एल्जिन रोडवरील निवासस्थानातून १९–२० मैलांवरच्या शरत्‌बाबूंच्या ग्रँड ट्रंक रोडवरील घरा-पर्यंत मोटारने जाण्याइतपत सुधारलेली आहे आणि नेताजी आता काही अंथरूणाला खिळून नाहीत असे पोलिसांना वाटेल आणि मग सरकार नेताजींना पुन्हा पकडेल असे वाटू लागले. कारण नेताजींची प्रकृती सुधारली की त्यांना पुन्हा तुरुंगात रवाना करण्याचा सरकारचा बेत असल्याचा सुगावा लागला होता.



जीवाची तगमग : रुग्णशय्येवर नेताजी

आपण अतिशय आजारी आहो, अंथरूणावरून आपणास हालता देखील येत नाही असे पोलिसांना वाटावे म्हणून तुरुंगातून सुटून आल्यापासून एकदा देखील सुभाषबाबू आपल्या खोलीतून बाहेर पडले नव्हते.

म्हणून मग एल्जिन रोडच्या घरातून शरत्‌बाबूंच्या ग्रँड ट्रक रोडवरील बंगल्यात मुक्काम हलवायचा बेत सोडून देण्यात आला. उगीच पोलिसांच्या डोळ्यावर यायला नको.

मग पुन्हा मूळच्या कल्पनेप्रमाणे एल्जिन रोडवरच्या घरातून बाहेर कसे निसटायचे त्याचाच विचार नव्याने सुरू झाला.

शिशिरने खूप डोके खाजवले. घराच्या पश्चिम बाजूकडील फाटकातून बाहेर पडले तर ? त्या बाजूला फारशी वर्दळ नसे. त्या फाटकातून नेताजींनी पायीच चालत जाऊन जवळच्या पोस्ट ऑफीसजवळ थांबायचे आणि मग शिशिरने तेथे मोटारगाडी घेऊन वाट पहावयाची आणि मग पटकन्‌ त्यांना गाडीत बसवून पसार व्हायचे ! पण पुन्हा चलबिचल झाली. हाही मार्ग धोक्याचाच वाटू लागला. शेवटी ठरवले की मोटारगाडी घराच्या आवारातच आणायची. पश्चिम बाजूच्या नागमोडी जिन्याखाली उभी करायची. तिथेच नेताजींनी गाडीत चढायचे व पळ काढायचा हाच सर्वांत बिनधास्त मार्ग वाटला.

काही अनपेक्षित व विलक्षण घडणार आहे अशी पुसटशी शंका देखील घरातील कोणाला येऊ नये याची काळजी चुलत्या-पुतण्यांनी घेतली. उलटपक्षी आता प्रकृती सुधारू लागली आहे; पोलिस पुन्हा आपणाला कधीही अटक करतील व जेलमध्ये नेतील असे भेटायला येणाऱ्या मित्रांना व घरातील मंडळींना नेताजी वारंवार सांगू लागले.

कलकत्त्यामधील अलीपूर न्यायालयात नेताजींविरुद्ध दोन खटले दाखल झालेले होते. काहीही करून न्यायालयात तारखेसाठी जावे लागू नये असा सुभाषबाबूंचा प्रयत्न होता. आजारपणाचे कारण त्यासाठी उपयोगी पडले. डॉक्टरी सर्टिफिकेट दाखल करून नेताजींनी न्यायालयात हजर राहण्याच्या आपत्तींतून सुटका करून घेतली.

घरात राहणारी लहान थोर नातेवाईक मंडळी, गडीमाणसे, भेटायला येणारी माणसे आणि बाहेर टेहळणी करणारे साध्या पोषाखातील सरकारी गुप्तहेर पोलिस यांना आपल्या गुप्त योजनेचा मागमूसही लागणार नाही याची सुभाषबाबू व शिशिर अगदी कसोशीने दक्षता घेत होते. इला घरातल्या माणसांकडे ध्यान देत होती तर शिशिर गुप्तहेर पोलिसांवर नजर ठेवून होता.

एल्जिन रोड व वुडबर्न रोड जेथे मिळतात त्या चौकात एका बाजूला टेहळणी करणारे पोलिस खाटा टाकून बसत. या दोन्ही रस्त्यांवरून नेताजींच्या घरात कोण येत जात असते तिकडे पोलिसांचे बारीक लक्ष असे. दिवसा व खूप रात्र पडेपर्यंत गुप्तहेर पोलिस इकडे तिकडे हिंडून दोन्ही घरांवर पाळत ठेवीत आणि रात्र बरीच झाली की 'सर्व काही आलबेल' आहे असे समजून पांघरूण घेऊन खाटेवर झोपून जात. थंडीमुळे त्यांना तात्काळ गाढ झोप लागे. शिशिरने ही वस्तुस्थिती हेरून ठेवली होती.

डिसेंबरातील नाताळच्या पहिल्या दिवशी नेताजींनी शिशिरची परीक्षा घेतली. शिशिर एका दमात मोटरने लांबचा प्रवास करू शकतो की नाही हे त्यांना पहावयाचे होते. नेताजींनी शिशिरला वाटेत कोठेही न थांबता मोटारने बरद्वानला जाऊन त्याचदिवशी परत येण्यास सांगितले. एवढ्या लांबच्या मोटार प्रवासात आपल्या

पुतण्याची किती दमछाक होते हे त्यांना अजमावयाचे असावे.

एक दिवस सायंकाळी शिशिर नेहमीप्रमाणे नेताजींना भेटायला गेला. त्यांच्या खोलीत बरीचशी माणसे होती. शिशिर खोली-बाहेरच खोळंबून राह्यला. तेव्हा नेताजींनी त्याला आत बोलाविले आणि त्यांना भेटायला आलेल्या एका व्यक्तीची ओळख करून दिली. ती एक उंचीपूरी देखणी पठाण व्यक्ती होती. नेताजींचा खाजगी चिटणीसही खोलीत होता. त्या पठाणाचे नाव मियाँ अकबर शाह आहे असे नेताजींनी शिशिरला सांगितले आणि ते म्हणाले,

"मियाँसाहेब आज सायंकाळी परत जायचे आहेत. त्यांचे तिकिट रिझर्व्ह करण्यासाठी मी सेक्रेटरीला हावडा स्टेशनवर पाठवतोय. तू मियाँसाहेबांना घेऊन बाजारात जा. त्यांना काही सामान खरेदी करायचे आहे."



मियाँ अकबर शाह

शिशिरने मियाँसाहेबांना आपल्या गाडीत बसविले आणि गाडी सुरू केली. वाटेत त्यांनी शिशिरला आपली थोडी हकीगत सांगितली. दोघे इंग्रजीत बोलत होते. नेताजींनी मियाँसाहेबांवर आपल्या लांबवरच्या प्रवासातील एक महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याचे शिशिरच्या लक्षात आले.

मियाँसाहेबांना घेऊन शिशिर वाछेलमुल्ला यांच्या धरमतल्ला मधील डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गेला. मियाँसाहेबांनी दोन पठाणी

पायजमे आणि एक काळी फेज कॅप खरेदी केली. ही खरेदी नेताजींसाठी होती.

नेताजींसाठी शिशिरदेखील काही प्रवासी सामान खरेदी करणार होता. एक मध्यम आकाराची सूटकेस, एक अटॅची आणि एक होल्डॉल तसेच फॅनेल शर्टची एक जोडी. एवढी खरेदी केल्यावर शिशिरला नेताजींसाठी काबुली सँडलसची जोडी खरीदायची होती. पण ती मिळाली नाही.

नेताजींकरता खरेदी केलेल्या सूटकेसवर व अटॅचीवर शिशिरने "एम्. झेड" अशी आद्याक्षरे रंगवून घेतली. नेताजी धारण करणार असलेल्या नावाची ती आद्याक्षरे होती.

आपल्यासाठी नेताजींनी युरोपीयन फॅशनचे काही गरम कपडे शोधून ठेवले होते. शिशिरने अटॅचीमध्ये ते भरले. कुराणाच्या दोन प्रती, काही नेहमीची औषधे आणि आयुर्वेदिक टॉनिकेही भरली.

नेताजींनी एका कागदावर ते घेणार असणारे त्यांचे खोटे नाव, पत्ता, व्यवसाय वगैरे लिहून दिला व शिशिरला भेटकार्डे छापून घेण्यास सांगितले. भेट कार्डावरील नाव, पत्ता वगैरे असा होता :

महम्मद जियाउद्दीन,
ट्रॅव्हलिंग इन्स्पेक्टर,
दी एम्पायर ऑफ इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि.
पर्मनन्ट ॲड्रेस
सिव्हिल लाइन्स, जबलपुर

प्रवासासाठी कुठली मोटारगाडी वापरायची ते ठरत नव्हते. बोस कुटुंबात दोन मोटारगाड्या होत्या. एक 'स्टुड बेकर' आणि दुसरी जर्मन मॉडेलची 'वॉन्डरर'. स्टुड बेकर गाडी शरत्‌बाबूंची

होती तर 'वॉन्डरर' शिशिरसाठी होती. शिशिर दोन्ही गाड्या चांगल्या चालवी. पण त्याने वॉन्डरर हीच गाडी बरोबर घ्यायचे ठरवले. नवी बॅटरी, जादा टायर वगैरे सर्व तयारी करून ठेवली.

धनबादजवळ बरारी येथे शिशिरचा भाऊ राहात होता. तेथपर्यंत जाऊन कलकत्त्याला परत येताना शिशिरने वाटेवरच्या सर्व खाणाखुणा चांगल्या ध्यानात ठेवल्या.

बरारीहून शिशिर परत कलकत्त्याला आला. नेताजी अगदी अधीर झाले असावेत असे त्याला वाटले. अजून वायव्य सरहद्द प्रांतातून हिरवा कंदील दाखवण्यात आला नव्हता.

नेताजींनी आता कोणाची गाठभेट घ्यायची नाही असे ठरवले. आपण सर्व गोष्टींतून निवृत्त होत आहोत असे त्यांनी जाहीर केले. ते संपूर्ण शाकाहारी बनले. दूध, फळे, मिठाई इत्यादींचे ताट त्यांच्या पहिल्या मजल्यावरच्या खोलीबाहेर ठेवले जाई.

शेवटी पलायनाचा दिवस उजाडला. १६ जानेवारी १९४१. घराच्या मागच्या बाजूने निसटायचे आधीच ठरले होते. शिशिरने धोतर, कुडता, गरम जाकीट असा नेहमीचाच पोषाख घातला.

नेताजींनी शिशिरला म्हटले, " अनिश्चित भविष्यात मी उडी मारतोय. कधी परत येईन कोण जाणे ! वीस वर्षे देखील लागतील. चार-पाच दिवस जरी माझं निसटणं गुप्त राह्यलं तरी पुरे ! "

एक उसासा टाकून ते पुढे म्हणाले "शिशिर, पोलिस तुझा छळ करतील. कदाचित् तुला दीर्घ काळ तुरुंगात राहावं लागेल. तुझी तयारी आहे ना ?"

शिशिरच्या वडिलांनीं शरत्बाबूंनीही शिशिरला म्हटले, " शिशिर, तुम्हा दोघांच्या सुरक्षिततेबद्दल तुला भरवंसा वाटतो ? चंद्रनगरला फ्रेंच पोलिस तुमची कार अडवून झडती घेण्याची शक्यता आहे. "

□ □




# अंधारात उडी

१६ ता. च्या सायंकाळी शिशिरने 'वाँडरर' गाडी घराच्या मागच्या बाजूला नागमोडी जिन्याखाली आणून ठेवली. नकळत सर्व सामान नोकरांकडून डिकीत भरून घेतले.

नेताजींनी नेहमीप्रमाणे जेवण घेतले. घरातले सर्व नातेवाईक, इला, व नेताजींची आई झोपायला निघून गेले. नेताजींनी आपल्या जेलमधील मित्रांना मुद्दाम पत्रे लिहली, "माझ्यावर दोन खटले चालू आहेत. मी लवकरच जेलमध्ये येईन."

लांबलचक व्हरांडा ओलांडून घराबाहेर पडावे लागे. निजानीज झाली होती. बाहेर पडायचा मार्ग निर्वेध होता. सुभाषबाबूंनी आपल्या खोलीत 'महम्मद जियाउद्दीन'चा पोषाख चढवला. काळी फेझ कॅप, तपकिरी रंगाचा लाँग कोट आणि युरोपात ते वापरत ते बूट. त्यांनी आपला सुप्रसिद्ध सोनेरी फ्रेमचा चष्मा काढून ठेवला.



नेताजी जेथून निसटले ते घर व ज्या मोटारीतून गेले ती मोटार

घरी द्विजेनला सुभाषबाबूंच्या पलायनाचे रहस्य जतन करून ठेवण्यास बजावले होते. तीन तासांनी त्याने 'लाइन क्लीअर'ची खूण दाखवली. मग इलाचा निरोप घेतला आणि भवितव्यतेच्या पोटात अंधारात नेताजींनी उडी मारली.

मोटारीत कडेच्या जागेवर ते बसले. शिशिर ड्रायव्हरच्या जागी बसला. आणि शिशिरची वाँडरर एस.एल.ए. ७१५९ मोटारगाडी

ता. १७ जानेवारीच्या मध्यरात्री बरोबर १ वाजून ३५ मिनीटांनी नेताजींना घेऊन निसटली. सी, आय. डी. पोलिस आपल्या खाटांवर डाराडुर झोपले होते. नीरव शांतता होती. गाडीने देखील त्या शांततेचा भंग केला नाही. एलिजन रोड, अॅलनबी रोड, लॅन्सडाऊन रोड पार करून गाडी लोअर सर्क्युलर रोडकडे जाण्यासाठी दक्षिणे-कडे वळली.

चुलत्या-पुतण्यांनी आपल्या मागावर कोणी नाही ना याची मागे वळून खात्री करून घेतली. पहाटे पहाटे धनबादला पोचायचे अशी योजना होती. रस्त्यातल्या दिव्यांचा उजेड चुकवत गाडी चालली होती.

सारे शहर निवांत झोपले होते. हावडा ब्रिजजवळ दोन टॅक्सी उभ्या होत्या. ग्रँड ट्रंक रोड ओलांडला. औद्योगिक भागांतून जाताना सशस्त्र पोलिस पहारेकरी मधून मधून दिसत होते. पण सुदैवाने या गाडीकडे त्यांचे लक्ष गेले नाही.

एक तासभर सुरक्षितपणे प्रवास झाल्यावर मग जरा हायसे वाटले. काकांनी पुतण्याला डी. व्हॅलेराच्या पलायनाची कहाणी गंभीरपणे ऐकवली.

कलकत्ता व बरद्वानच्या मध्यावर गाडीचे इंजिन बंद पडले. पेट्रोल फार भरल्याने तसे झाले होते. चंद्रनगर जवळ येत चालले. दोघांनी आगामी संकटाला तोंड देण्याची तयारी केली. पण त्या फ्रेंच शहरातून गाडी बिनधोकपणे बाहेर पडली.

शिशिरने गाडीची गती मध्यम ठेवली होती. पहाटे ४ नंतर बरद्वान शहर पार करून गाडी पुढे चालली. असनसोल शहराच्या सीमेवर तांबडे फटफटले. पेट्रोल भरून घेऊन असनसोलमधून शिशिरने गाडी बाहेर काढली.

असनसोल ते धनबादचा रस्ता उताराचा आहे. उलटच्या दिशेने खूपच गाड्या जाताना दिसल्या. या रस्त्यावर चेक-पोस्ट होते. चौकीवरच्या माणसाने नेहमीप्रमाणे गाडीचा नंबर टिपून घेतला. आडवा दांडा काढला व गाडी पुढे निघाली.

धनबादला पोचता पोचता चांगलेच उजाडले होते. शिशिरला ओळखले जाऊं की काय असे भय वाटले. पण नशिबाने बरारीला ८॥ वाजता गाडी शिशिरच्या भावाच्या घरापाशी सुरक्षितपणें येऊन थडकली.

आसपास कोणी नाही असे पाहून शिशिरने नेताजींना घरापासून काही अंतरावर एके ठिकाणी गाडीतून उतरविले आणि तो एकटाच गाडी घेऊन भावाच्या घराकडे गेला. घराच्या अंगणात कुणी तरी दोन नोकर माणसे बसली होती. त्यांना शिशिर एकटाच आलेला दिसला.

शिशिरचा भाऊ अद्याप झोपलेला होता. दार जोरात खटखटून शिशिरने त्याला उठविले. शिशिर येणार असल्याची पूर्वसूचना त्याला मिळाली होती, तरी शिशिरला पाहून त्याला काहीसे आश्चर्य वाटले. एका बाजूला घेऊन शिशिरने भावाला सांगितले, " माझ्या बरोबर सुभाषबाबू वेशांतर करून आले आहेत. ते अत्यंत गुप्त अशा एका कामगिरीवर निघाले आहेत. ते विमा एजंट बनले आहेत. विम्याच्या कामाचे नाटक करून ते तुझ्याकडे थोड्या वेळात येतील. ते आले की तू त्यांना सांगायचं, 'मला आता कामावर जायचं आहे. वेळ नाही.' मग सुभाषबाबू म्हणतील, 'मी फार लांबून आलो आहे. तुम्ही नंतर भेटणार असाल तर मी थांबतो. एखाद दिवस तुम्ही मला इथं राहूं द्याल तर आभारी होईन.' मग तू सुभाषबाबूंना म्हणायचंस, 'जरूर राहा इथं.' तूं

सुभाषबाबूंशी इंग्रजीत बोलायचं. पण नोकरचाकरांना ऐकू गेलं पाहिजे अशा तऱ्हेनं बोल. उगीच त्यांना संशय यायला नको,"

शिशिरचे बोलणे संपते न संपते तोच एका नोकराने कोणीतरी परका माणूस भेटायला आल्याचे शिशिरच्या भावाला सांगितले शिशिर आपण त्या गावचेच नाही असे नाटक करून तेथून सटकला.

शिशिरचा भाऊ खोलीतून व्हरांडचात त्या 'परक्या' माणसाला नेताजींना–भेटायला गेला. दोघांचे पूर्वी ठरल्याप्रमाणे बोलणे झाले. शिशिरचा भाऊ त्या पाहुण्याला दिवाणखान्यात घेऊन गेला. आणि नोकरांना बोलावून 'पाहुण्या'ची नीट व्यवस्था ठेवायला सांगितले.

'पाहुण्या'ची एका स्वतंत्र खोलीत व्यवस्था करण्यात आली. सकाळचा नाश्ता व दुपारचे जेवण पाहुण्याला त्याच्या खोलीतच देण्यात आले. सबंध दिवसात 'पाहुणा' एकदाही आपल्या खोली-बाहेर पडला नाही.

संध्याकाळी शिशिरचा भाऊ कामावरून परत आला. त्याचे व 'पाहुण्या'चे व्हरांडचात काही तरी बोलणे झाले. त्यातून असन-सोल ऐवजी गोमोह रेल्वे स्टेशनवर 'पाहुण्या'ने ऊर्फ सुभाषबाबूंनी दिल्ली–काल्का मेलमध्ये चढावे असे ठरले. गोमोह स्टेशनकडे जाण्याचा रस्ता शिशिरला माहित नव्हता. म्हणून शिशिरबरोबर त्याच्या भावाने रस्ता दाखविण्यासाठी जावे असेही ठरले.

परंतु 'पाहुण्या'ला बरोबर मोटारीत घेऊन घरातून निघणे धोक्याचे होते. म्हणून रात्र पडताच 'पाहुण्या'ला त्याच्या खोलीत जेवायला घातले आणि जेवण संपल्यावर घरापासून दूर एके ठिकाणी जाऊन उभे राह्यला सांगितले. त्याप्रमाणे 'पाहुण्या'ने जेवण आटोपले व नोकरांच्या देखत शिशिरचा व त्याच्या भावाचा

निरोप घेऊन तो घराबाहेर पडला आणि ठरलेल्या ठिकाणी जाऊन थांबला. दोघा भावांनी आपलेही जेवण आटोपले आणि 'पाहुणा' थांबला होता तेथे मोटरने गेले. 'पाहुणा' ऊर्फ महम्मद जियाउद्दिन ऊर्फ सुभाषबाबू त्यांची वाट पहात होते. त्यांना मोटरीत घेऊन त्यांचे दोन पुतणे गोमोह स्टेशनकडे रवाना झाले.

तीस मैलांवर गोमोह होते. तेथे दिल्ली–काल्का मेल पकडायची होती. गाडी मध्यरात्री होती. हाताशी वेळ भरपूर होता. गाडी यायच्या वेळी तिघे स्टेशनांत शिरले. सुभाषबाबू उर्फ महम्मद जियाउद्दीन, आपल्या आरक्षित केलेल्या बर्थवर जाऊन बसले. म्हणाले, "आता तुम्ही दोघे जा. मी ठीक आहे." तेच त्यांचे शेवटचे शब्द. दोघा पुतण्यांनी त्यांना प्रणाम केला व जड अंतःकरणाने निरोप घेतला.

गाडी संथगतीने बाहेर पडली. प्लॅटफार्मच्या बाहेर पडल्यावर तिने वेग घेतला.

इकडे सुभाषबाबूंची खटल्याची तारीख २७ जानेवारीला होती. सुभाषबाबू कोर्टांत हजर झाले नाहीत. मग त्यांना शोधण्याचे नाटक घरांतल्यांनी जोरात सुरू केले. पोलीस तर गोंधळून गेले. इतस्ततः तारा पाठविल्या. वेगवेगळ्या दिशांना शोधायला पोलिस पथके रवाना झाली.

केदारटोला, स्मशानभूमी, कालीघाटमंदिर सर्वत्र चौकशी झाली. सुभाषबाबू अध्यात्माकडे झुकले आहेत. विरक्त बनले आहेत असे पसरवले जात होतेच. कालीघाटच्या एका बाबाने भविष्य वर्तवले, "त्यांनी संन्यास घेतला आहे."

आनंद बाजार पत्रिका व हिंदुस्थान स्टँडर्डमध्ये ही बातमी आली. पोलिस पार्टीने सुभाषबाबूंच्या घराभोवती चकरावर चकरा

मारल्या. ते घरांतून कोठून पळून जाणे शक्य आहे त्याचाही विचार केला. पण पोलीसांची मति काम करेनाशी झाली.

ऑल इंडिया रेडियोच्या सायंकाळच्या बातमीपत्रात सांगण्यात आले, " धनबादजवळ झारिया येथे सुभाषबाबूंना अटक करण्यात आली आहे." पण लगोलग त्या बातमीचा इन्कारही करण्यात आला.

हरद्वारला एका साधूला सुभाषबाबू म्हणून पकडून नंतर सोडून दिले. सरदार शार्दूलसिंग कवीश्वर यांनी सुभाषबाबू सर्वसंग-परित्याग करून साधू बनले आहेत आणि दक्षिण भारतात संचार करीत आहेत अशी वावडी सोडून दिली.

इकडे सुभाषबाबू गोमोह स्टेशनवर पेशावर एक्स्प्रेसचे तिकिट काढून सेकंड क्लासमध्ये बसले. दोघे पुतणे त्यांचा निरोप घेऊन निघून गेल्यावर आपल्या बर्थवर त्यांनी जी ताणून दिली ते सकाळीच जागे झाले.

कोणीतरी एक शीख लष्करी अधिकारी त्यांच्या डब्यात शिरून सुभाषबाबूंच्या समोरच बसला. चौकशी करू लागला. त्याने सुभाषबाबूंना विचारले, " आपण कोण ? कुठं चालला आहात?"
" मी मूळ लखनौचा राहणारा. माझं नाव जियाउद्दीन. मी विमा प्रचारक असून रावळपिंडीला चाललोय."

हातातल्या वर्तमानपत्रांनी सुभाषबाबूंची बरीच सुटका केली. दिवसभर तोंडासमोर वर्तमानपत्र धरून ते त्या शिखाची नजर चुकवीत होते. वाचनात दंग असल्याचे नाटक त्यांना चांगलेच जमले. अर्थात नाटक वठवण्याचा देखील प्रश्न नव्हता. खरोखरच सुभाषबाबूंना वृत्तपत्रे वाचायची होती. स्टेशन आले की वृत्तपत्रा-आड सुभाषबाबू तोंड लपवीत.

चुस्त चुणीदार पायजमा, शेरवानी, मस्तकावर फेज टोपी आणि या साऱ्या पोषाखाला शोभणारी काळीभोर लांब दाढी ! वाहवा ! काय सोंग वठले होते ? मौलवी नाही असे म्हणण्याची कुणाची बिशाद होती ? अगदी जवळचा मित्र देखील ओळखू शकला नसता.

शेवटी संपला एकदाचा तो जीवघेणा प्रवास. १७ जानेवारीला रात्री ९ वाजता सुभाषबाबू पेशावरला पोहचले एकदाचे ! स्टेशनवर मोटार घेऊन आलेल्या माणसाने सुभाषबाबूंना सुखरूप पाहून सुटकेचा श्वास टाकला.

आता काबूलच्या प्रवासाच्या तयारीला सुभाषबाबू लागले. तथापि दोन दिवस त्यासाठी पेशावरला थांबावे लागले. पण ते त्यांना अग्निदिव्य वाटले नाही. कारण सुभाषबाबूंच्या मित्रांनी अगदी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

१९ जानेवारीला सुभाषबाबूंनी मौलवीचा वेष टाकला आणि पठाणाचा वेष घेतला. कारण आता प्रवेश करायचा होता अफगाणिस्तानात. तेथे सीमेवरच्या पठाणासारखे दिसणेच अधिक सुरक्षितपणाचे होते. सुभाषबाबूंच्या समवेत रहमतखान नाव घेतलेला त्यांचा सहकारी भगतराम व आणखी एकजण होता. मोटारीने तिघे पेशावरहून निघाले ते जमरूदला पोहचले.



भगतराम ऊर्फ रहमतखान

जमरूदच्या किल्ल्याच्या थोडे पुढे एक कच्चा रस्ता लागला. तो पार केल्यावर गढी नावाच्या एका छोटयाश्या खेडयात गाडी पोचली. त्यापुढे मोटार जाण्याजोगा रस्ता नव्हता. मोटार व तिसरा मित्र यांना जियाउद्दीन (सुभाष) व रहमतखान (भगतराम) यांनी निरोप दिला. तो मित्र चितातूर मनाने मोटारीने परत गेला. दोघांनी रात्र गढीतच काढली. बरोबर दोन बंदुकधारी पठाण घेऊन दोघे पायरस्त्याने काबूलच्या मार्गाला लागले. जियाउद्दीनने यापुढे आपण मुके व बहिरे आहोत असे नाटक वठवावयाचे ठरवले. कारण त्यांना पठाणांची पुश्तु भाषा येत नव्हती.

२१ जानेवारीला सायंकाळी नेताजी म्हणजेच बहिऱ्या व मुक्या जियाउद्दीनने (सुभाषनी) रहमतखानासह (भगतराम) भारताची सीमा ओलांडली. पहिले गाव लागले तेथे अड्डा शरीफ नावाचा प्रसिद्ध दर्गा होता. तेथल्या पीरसाहेबांच्या दर्ग्यात दोघांच्या राहण्या जेवणाची सोय झाली. जमिनीला पाठ लावायचा अवकाश, दोघे गाढ झोपी गेले. सोबतीला आलेले पठाण परतले व तीन नवे बंदुकधारी पठाण सोबत करू लागले.

थांबून चालणारच नव्हते. पुढचा प्रवास सुरू झाला हा रस्ता फारच बिकट आणि धोक्याचा होता. थांबत थांबत कसेबसे रात्री ९ वाजता सारे लालमुऱ्याला पोचले. लालमुऱ्याला खान नावाच्या इसमाकडे आगाऊच व्यवस्था केली होती. हा खान म्हणजे जबरदस्त असामी होती. आसपासच्या प्रदेशावर त्याचे खूपच वजन होते. अफगाण सरकारच्या दरबारातही त्याला मान होता. त्याच्या गढीत जेवण, झोप झाल्यामुळे आराम मिळाला. पण चालून चालून नेताजींच्या पायांची चाळण झाली होती व ते कमालीचे थकले

होते. खान म्हणाला, "आता फारसं चालायचं उरलंच नाही. थोडी कळ काढलीत की काबूल नदी लागेल. नदी ओलांडली की लगेच मोटार रस्ता आहे. तिथं काबूलकडे जाणाऱ्या खूप बसेस आहेत. तुम्ही अगदी आरामात काबूलला पोचाल."

खान हा फार सावध गृहस्थ होता. निघताना त्याने पर्शियन भाषेत एक ओळखपत्र दिले, "जियाउद्दीन व रहमतखान सरहद्द प्रांतातले रहिवासी असून साखीसाहेबांच्या दर्ग्याच्या यात्रेला ते जात आहेत. त्यांची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे. त्यांना कोणीही त्रास देऊ नये."

ही चिट्ठी देऊन खान म्हणाला, "वाटेत कुणी त्रास देऊं लागला, कुणाला कसली शंका आली तर हे ओळखपत्र दाखवा. अफगाणिस्तानात तरी तुम्हाला कोणी या ओळखपत्रामुळे त्रास देणार नाही."

दोघांबरोबर दोन सशस्त्र पठाण होते. काबूल नदी जवळ होती हे खरे. पण ती ओलांडायला नाव नव्हती. कातड्याच्या पोकळ आणि फुगीर पिशव्या दोरीने एकत्र बांधून त्याचा तराफा करण्यात आला होता. त्यावर एक कोळ्याचे जाळे पसरून टाकले होते. लोक त्यावर बिनधास्तपणे बसून जा–ये करीत होते. सुभाषबाबूंना प्रथम भय वाटले. पण मग मनात आले, एवढे लोक जात येत आहेत मग भ्यायचे कशाला ? शेवटी दोघांनी त्या तराफ्यावरून नदी ओलांडली.

अफगाणिस्तानात शस्त्रधाऱ्यांना मज्जाव असल्याने सोबतीचे सशस्त्र पठाण मागेच राहिले. ज्या मार्गाने नेताजी पेशावरहून अफगाणिस्तानात शिरले तो मार्ग आडवळणाचा होता. त्यामुळे ५० मैलांचा जास्त फेरा पडला होता. पेशावर ते डुक्का या सरळ मार्गावर तीनदा पासपोर्टची तपासणी होत असल्याने तो टाळणे

क्रमप्राप्तच होते.

दोघेही खूपच थकले होते. मोटारमार्गावर आल्यावर एक चुंगी दिसली. चुंगी म्हणजे झाडांची राई व विहीर असलेले ठिकाण. नेताजी कमालीचे क्लान्त झाले होते. ते त्या चुंगीत जाऊन जवळपास कोसळलेच. भगतराम रस्त्यावर उभा राहून काबूलकडे जाणाऱ्या मोटारगाड्यांना हात उंच करून थांबवण्याचा प्रयत्न करीत होता. पण कुठलीच मोटार दखलही घेईना. अखेर एक मोटार थांबली एकदाची. त्या मोटारीत मोठमोठे पेटारे भरले होते. ड्रायव्हरने त्या पेटाऱ्यांवर बसायला सांगितले. बालपणापासून आतापर्यंत सुभाषबाबूंनी काढलेले हाल अगदी वेगळे होते. पण या प्रवासातील अपेष्टा कल्पनेलाही न मानवणाऱ्या होत्या. शेवटी नाइलाजाने दोघे त्या पेटाऱ्यांवर बसले. गारठवणारी थंडी बाहेर मी म्हणत होती. गरम कपडे तर दोघांजवळही नव्हते. गाडीच्या दुतर्फा झाडें होती. झाडाच्या फांद्या चुकवण्यासाठी मस्तके विनम्र अवस्थेतच ठेवावी लागत होती. जरा डोके वर काढले तर कपाळमोक्ष होण्याचे भय होते. एकच आधार होता. वाटेत बऱ्याच ठिकाणी गरम चहा प्यायला मिळत होता. दोघांना वाटले, या चहाने जीव वाचला. कशीतरी रात्र सरली.

बट्टखाकला गाडी पोचली तेव्हा उजाडले होते आतापर्यंत चुकवता आलेला प्रसंग आता सामोरा आला. एका अधिकाऱ्याने हटकले. लालपुऱ्याला खानाने दिलेल्या ओळखपत्रामुळे दोघे वाचले. अर्थात् थोडीशी लाच द्यावी लागली. दोघांनी पेशावरमधून निघताना काही अफगाण रुपये जवळ घेतले होते म्हणून बरे ! सायंकाळी ५ वाजता सुभाषबाबू ऊर्फ जियाउद्दीननी आपला सहकारी भगतराम याच्यासमवेत काबूलच्या भूमीवर पाय टेकला.

□ □

वा. क्र. २०५७ : १७/७/८७
विषय पा.वा.

# काबूलमधील ते चाळीस दिवस

त्यावेळी कडाक्याची थंडी पडली होती. बर्फ पडत होता. दोघेही काबूलमध्ये परके, ना कुठे ओळख ना देख. दोघांना लाहोरी दरवाजाजवळ उतरवण्यात आले होते. तेथून कुठे जायचे हा मोठाच प्रश्न पुढे उभा राह्यला. काहीशा अंतरावर थोडीशी माणसे दिसली. बर्फाच्या आणि चिखलाच्या लगद्यांतून दोघे मोठ्या कष्टाने त्यांच्या दिशेने चालू लागले. बर्फ व चिखल तुडवताना एवढे हाल होतील याची कल्पना देखील दोघांना नव्हती. बाजार पेठेत आल्यावर भगतरामने एकाला विचारले,

"सराई कुठंय ?"

बोटाने खूण करत तो म्हणाला,

"ती बघा. तिथं लहान लहान खोल्या आहेत. प्रवाशांना भाड्यानं मिळू शकतात."

सराईच्या अंगणात बरेचसे उंट व घोडे बांधले होते. ही सराई की तबेला? भगतराम पुश्तु भाषेत चौकीदाराची चौकशी करत होता. पण तेथे पुश्तु कुणालाच कळत नव्हती. अफगाण लोकांची भाषा फारसी. सगळाच घोटाळा झाला.

पण शेवटी एकाने चौकीदाराची खोली दाखवली. त्याला थोडेसे पुश्तु कळत होते. त्याने दोघांना एक खोली दाखवली. ती खोली म्हणजे अंधार कोठडीच होती. पण आइनस्टाईनच्या सापेक्षतेच्या सिद्धान्ताची साक्ष पटली. ती कोठडी म्हणजे जणू नंदनवनच होय असे त्या परिस्थितीत दोघांना वाटले. रोज एक अफगाणी रुपया भाडे होते. दोघांनी आणखी एक रुपया भाड्याने दोन खाटा घेतल्या.

भगतरामने शेकोटीसाठी आणलेली लाकडे ओली असल्याने खोलीत धूरच धूर झाला. बाहेरून येणारा वारा झोंबणारा होता. त्यामुळे दार बंद करणे भागच होते. मग कशी तरी वाळलेली लाकडे आणून शेगडीत विस्तव फुलवला.

संध्याकाळी भगतरामने बाजारातून मेणबत्त्या व खाण्यासाठी रोटी व कबाब आणले. थंडीमुळे रोटी लाकडासारखी कठिण झाली होती. नेताजींनी चहाबरोबर कशीतरी ती खाल्ली. एक मात्र झाले. अतिथकव्याने त्या 'नंदनवना'त गाढ झोप मात्र मिळाली. पण त्या विश्रांतीने सकाळी शरीरातले सारे सांधे व हाडे ठणकू लागली पाय बोलू लागले. ती 'अमृततुल्य' न्याहारी आटोपून भगतराम बाजारात गेला आणि दोन कातडी जाकिटे, दोन छोट्या सतरंज्या, एक किटली असे सामान घेऊन आला.

पुढे काय करायचे या चिंतेने नेताजी ग्रस्त होते. काबूलमध्ये लपून छपून दिवस काढणे हे काही त्यांचे उद्दिष्ट नव्हते.

पाच सहा दिवसांनी एक नवेच संकट पुढे आले. भगतरामला सराईच्या भटारखान्यात पांढरे कपडे घातलेला एक माणूस आढळला. तो नेहमी तिथे असायचा. भगतरामना संशय आला की तो अफगाणी गुप्त पोलिस असावा आणि तो त्यांचा अंदाज खरा ठरला.

एक दिवस सुभाषबाबू व भगतराम दुपारचे जेवण संपवून आपल्या खोलीत जाताच तो गुप्त पोलिस त्यांच्या खोलीसमोर येऊन दरडावून विचारू लागला

" कोण आहात तुम्ही ? इथं कशासाठी आलात ?"

" आम्ही सरहद्दीवरील टोळीवाल्यांपैकी आहोत. हा माझा (नेताजींकडे बोट दाखवून) थोरला भाऊ. जन्मापासून तो मुका व बहिरा आहे बिचारा आजारी आहे म्हणून मी त्याला सुखी-साहेबांच्या यात्रेला घेऊन चाललोय. बेफाम वर्फ पडत असल्याने सुखीसाहेबांच्या दर्ग्याकडे जाणारा रस्ता सध्या बंद आहे. तो खुला झाला की आम्ही आमचा मुक्काम येथून हलवू " रहमत-खानने खुलासेवार उत्तर दिले.

" तुमच्या बोलण्यावर माझा विश्वास नाही. चला माझ्या-बरोबर कोतवालीत " गुप्त पोलिसाने धमकावले.

भगतराम हात जोडून म्हणाला, " आमच्यासारख्या गरीब यात्रेकरूंना का छळता ? थंडीचा कोण कडाका आहे. माझ्या गरीब बिचाऱ्या भावाला आजारपणामुळे धड उभंही राहता येत नाही. हवं तर मी येतो तुमच्याबरोबर कोतवालीत. "

मनोमन दोघेही घाबरले होते पण गुप्त पोलिसाचे धमकावणेही वरवरचेच होते. खोटया गुर्मीने तो म्हणाला, " ठीक आहे.

तुझा भाऊ आजारी आहे म्हणूनच सोडतो. आता एकवेळ दया दाखवतोय. पण इथून शक्य तितक्या लवकर हला."

"सुखीसाहेबांच्या दर्याचा रस्ता ज्या दिवशी मोकळा होईल तत्क्षणी आम्ही येथून निघालोच म्हणून समजा" भगतराम म्हणाला.

"ठीक आहे. झोपा" जाण्यासाठी वळता वळता तो पोलिस पुढे म्हणाला, "छे ! छे ! बाहेर थंडी मी म्हणतोय. चहा प्यायला पैसे तर द्याल ?"

भगतरामने त्याच्या हातावर दोन अफगाणी रुपये ठेवले तेव्हा तो चालता झाला.

तिसऱ्या दिवशी तो पुन्हा दत्त म्हणून पुढे उभा राहिला. नेताजी त्यावेळी एकटेच खोलीत होते. तो पुश्तूत काहीतरी बोलला. नेताजी तर बहिरे व मुके होते. काही वेळाने भगतराम आला. त्याला त्या गुप्त पोलिसाने खडसावले, "काय ? अजून तुम्ही सुखीसाहेबाला जायला निघाला नाही ?"

"अहो, निघालो तर काय ? सुखीसाहेबाला जाणारी बस केव्हा मिळणार त्याची चौकशी करायलाच मी बस स्टँडवर गेलो होतो. पण तिकडचा रस्ता अजूनही बंद आहे असे कळलें. आता त्याला हो आम्ही काय करणार ?"

पुन्हा त्या बदमाशाच्या हातावर ५ अफगाणी रुपये टिकवून दोघांनी त्याला कसेतरी वाटेला लावले. तो गेल्यावर नेताजी भगतरामला म्हणाले,

"या माणसाची ब्याद कशी टाळायची ? हा रोज असे पैसे उकळू लागला तर आपला कसा पाड लागेल ?"

"मग आपण इथला मुक्काम हलवून दुसऱ्या सराईत जायचं का ?" भगतरामने विचारले. नेताजी म्हणाले,

"आणि तिथंही असाच याचा काका मामा मागं लागला तर ?" काहीसा विचार करून नेताजी पुढे म्हणाले,

"अरे भगतराम, तुझ्या ओळखीचे उत्तमचंद म्हणून या गावात इथं काबूलमध्ये कुणी आहेत ना ? त्यांना तू का भेटत नाहीस ? बघ तर खरं भेटून !"

पण उत्तमचंदांच्या तपासाला लागण्याआधीच सकाळी न्याहारीच्या वेळी तो गुप्त पोलिस धाडकन त्यांच्या खोलीत घुसला खाटेवर बसत त्याने म्हटले,

"तुम्ही काय वाटेल त्या थापा ठोकता हो ? सुखीसाहेबाचा रस्ता सुरू होऊन दोन दिवस झाले."

"हा काय मी बस स्टँडवरच चाललो आहे" भगतरामने उत्तर दिले. त्यावर तो पोलिस म्हणाला,

"मला तुमचा संशय येतोय. तुम्ही मोहंमद टोळ्यांपैकी (अफगाणिस्तानातील एक बंडखोरांची टोळी) दिसताय. आमच्या सब इन्स्पेक्टरनं तुम्हाला चौकीवर बोलावलंय. चला आटपा तुमची न्याहारी."

चहाच्या नावावर पैसे उकळून झाल्यावर आता सब् इन्स्पेक्टरच्या नावावर पैसे लुबाडण्याचा त्याचा बेत असावा. पण 'सुसरबाई तुझी पाठ मऊ' हाच स्वर चालू ठेवायला हवा होता म्हणून भगतराम काकुळतीने म्हणाला,

"आम्ही कट्टर धर्मनिष्ठ मुसलमान यात्रेकरू आहोत उगाच का आम्हाला छळताय ? चला हवं तर येतो मी तुमच्याबरोबर. पण

माझा भाऊ मात्र येणार नाही."

' येणार नाही म्हणजे ? तुम्हा दोघांना घेतल्याशिवाय मी इथून हलणार नाही" तो राक्षस कडाडला.

त्या संकटातून सुटण्याच्या हेतुने भगतरामने ५ रु. ची नोट त्याच्या हातात सरकवली. ती खिशात घालून तो कोडगेपणाने म्हणाला, " एवढ्यानं नाही भागायचं ! "

त्या लाचखाऊ हलकटाला आणखी पैसे उपटायचे होते. अखेर १७ रु. वर सौदा तुटला. अफगाणिस्तानात पोलिसाचा दरमहा पगार ३० अफगाण रुपये म्हणजे ६ भारतीय रुपये असतो.

१७ रु. बळकावून तो गुप्त पोलिस उठला पण दरडावून म्हणाला,

" आजच्या दिवसाचा प्रश्न मिटला. उद्या या जागी जर का दिसलात तर मात्र काही ऐकणार नाही. पोलिस चौकीवर तुम्हाला यावंच लागेल,"

भगतरामने त्याचे आभार मानले व नमस्कार केला. अकस्मात त्याचे लक्ष भगतरामच्या घड्याळाकडे गेले. त्या नीचाने त्या घड्याळावर झडपच घातली.

भगतरामने उत्तमचंदांच्या दुकानावर दोन खेपा घातल्या. पण दुकान बंद होते. काय करणार ? रात्र तर झाली होती. सकाळी तो मृत्युदूत दाराशी खडा होता. तो भगतरामला म्हणाला,

" अरे, तूं दिलेलं सुंदर घड्याळ माझ्या वरिष्ठ साहेबानं उपटलं. काय किंमत होती रे त्याची?"

" मला नाही माहीत ! "

सब इन्स्पेक्टरला शिव्या घालत तो पोलिस भगतरामला म्हणाला,

"मला ५ रु. दे. उद्या फार तर मी तुला ते परत करीन."

त्या लाचाराच्या तोंडावर ५ रु. भगतरामने फेकले खरे पण उंटाच्या पाठीवरची ती शेवटची काडी होती. आता आणखी ओझं सहन करणं शक्य नव्हतं.

भगतरामने उत्तमचंदना गाठायचे असा निश्चय केला. सुदैवाने उत्तमचंद दुकानात होते. "अस्सलाम आलेकुम" म्हणून भगतराम दुकानाच्या दाराशी उभा राह्यला.

खाकी पेशावरी कुडता अन् सलवार घातलेल्या आणि कमरेला चामडी रुंद पट्टा व त्यावर गळाबंद चामडी जाकिट घालून उभ्या असलेल्या भगतरामकडे उत्तमचंद पाहातच राह्यले. त्याच्या मस्तकावरचा पठाणी फेटा, पायात गरम मोजे आणि पेशावरी चपला यामुळे तो सरहद्दीवरील टोळीवाल्यासारखा दिसत होता. दुकानात शिरून त्याने उत्तमचंदना विचारले,

"आपलंच नाव उत्तमचंद काय ?"

"हो"

स्मितहास्य करून भगतराम खुर्चीवर बसला. दुकानात अमरनाथ नावाचा एक १५-१६ वर्षांचा पोरगा होता. तो भगतरामकडे चमत्कारिकपणे पाहू लागला. भगतरामना त्या पोरासमोर काही बोलायचे नव्हते योगायोगाने उत्तमचंदाच्या ते लक्षात आले. त्यांनी त्या पोराला चहा आणण्या-



उत्तमचंद

साठी म्हणून बाहेर पिटाळले.

भगतराम उत्तमचंदना म्हणाले,

" मी एक भारतीय माणूस आहे. काही राजकीय कामात मला तुमची मदत हवीय. माझं नाव भगतराम. मर्दान जिल्ह्यातील घल्लाडेर खेड्यात माझं घर आहे. पंजाबच्या गव्हर्नराला गोळी झाडून ठार मारण्याचा ज्याने प्रयत्न केला तो माझा भाऊ. "

उत्तमचंदाची चुलती घल्लाडेरची राहणारी होती. भगतरामच्या शेजारीच चुलतीचेही घर होते. उत्तमचंदनी भगतरामना ओळखले व प्रेमाने मिठी मारली. काबूलमधले दुकान खरं म्हणजे उत्तमचंदच्या चुलत्याचे. उत्तमचंद त्यांच्या दुकानात काम करतात हे घल्लाडेरमधील लोकांना माहीत होते. त्यामुळे भगतराम शोध काढत उत्तमचंद यांचेकडे आला यात अस्वाभाविक काहीच नव्हते. उत्तमचंदनी त्याला विचारले,

" कोणत्या राजकीय कामात तुम्हाला माझी मदत हवीय ? "

भगतरामाने इकडे तिकडे पाहून उत्तमचंदच्या कानात हळू आवाजात सांगितले, " सुभाषचंद्र बोस धोका पत्करून मोठ्या अडचणींचा पर्वत पार करून इथवर आले आहेत. "

उत्तमचंद गांगरलेच. तो अनपेक्षित धक्का त्यांना साहवेना. धडधडत्या अंतःकरणाने चाचरतच त्यांनी विचारले, " काय ? सुभाषबाबू इथे आलेत ? "

" होय. एका सराईत आम्ही उतरलो आहोत. पण एका अफगाणी पोलिसाला आमचा संशय आलाय. तिथं राहाणं आता अगदी अशक्य आहे. सुभाषबाबूंना तुमची राजकीय पार्श्वभूमी माहीत आहे. या संकटातून तुम्हीच आम्हाला वाचवाल असा

त्यांना विश्वास वाटतो."

"पण माझं नाव व राजकीय कार्य त्यांना कसं कळलं ?"

"मीच सांगितलं" भगतराम म्हणाला.

उत्तमचंद मूळचे पेशावरचे राहणारे. तेथेच त्यांचे शिक्षण झाले. १९२९ साली ते १८ वर्षांचे असताना कॉंग्रेसचे सभासद झाले. पेशावर येथे तेथील "नवजवान भारत सभा" या क्रांतिकारी संघटनेचे ते सदस्य होते.

१९३० च्या संग्रामात पेशावर मधील कॉंग्रेस पुढाऱ्यांना सरकारने अटक केली. गोळीबारात कैक शहीद झाले. उत्तमचंदना देखील २ वर्षे सक्तमजूरीची शिक्षा झाली. 'नवजवान सभा' बेकायदा ठरवण्यात आली. १९३२ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर उत्तमचंद काबूलला आले. त्यांच्या चुलत्याने आपले रेडियोचे दुकान त्यांना चालवायला दिले. पुढे ते तेथे स्थायिक झाले.

भगतराम पुढे म्हणाले, "पोलिसांच्या ससेमिऱ्यामुळे तुमच्याकडं येता आलं नाही."

बोलता बोलता भगतराम थांबले. कारण अमरनाथ चहा घेऊन आला. मग दोघांनी पुश्तु ऐवजी उर्दूत बोलायला सुरवात केली. कारण अमरनाथला उर्दू कळत नव्हते.

उत्तमचंदनी विचारले, 'सुभाषबाबूंचे पुढचे बेत काय आहेत ?'

'सुभाषबाबूंची इच्छा रशियाला जाण्याची आहे. आम्हाला इथं येऊन आज तेरा दिवस झाले. आज ३ फेब्रुवारी ना ? एवढे दिवस लाहोरी दरवाज्याजवळच्या एका अत्यंत गलिच्छ सराईत एका अगदी छोट्याशा खोलीत आम्ही राहतोय. तिथंही गुप्त पोलिस पाठीमागे. आता तिथं राहणं अशक्य झालंय म्हणून तर

तुमच्याकडं आलो." एक दीर्घ निश्वास टाकून भगतराम पुढे म्हणाले,

"रशियन वकिलातींत जायचा खूप प्रयत्न केला. पण कोणाही नवख्याला तिथं प्रवेश मिळत नाही. एकदा काय झालं, रशियाचा राष्ट्रध्वज असलेली मोटार त्या वकिलातीतून बाहेर पडताना आम्हाला दिसली. गाडी थांबवून मी म्हटले, "हे सुभाषचंद्र बोस. आम्हाला आपली मदत हवीय."

"हे कशावरून सुभाषचंद्र बोस?" रशियन वकील म्हणाला. अर्थात त्याची खात्री कशी पटवता येणार होती? भगतराम म्हणाला, "आमच्या डोळ्या समोरून गाडी निघून गेली. एक दुर्भिळ संधि आम्ही गमावली. सुभाषबाबूंना फार हळहळ वाटली."

उत्तमचंदना वाटले, सुभाषबाबूंबरोबर रशियन भाषा येणारा माणूस खरे तर हवा होता. भगतराम पुढे बोलू लागला, "रशियन वकिलातीची आशा संपल्यावर आम्ही इटालियन वकिलातीशी संबंध जोडण्याचा प्रयत्नाला लागलो. तिथं मात्र यश आलं. बरीच मोठी हकीगत आहे ती! पण थोडक्यात सांगायचं तर आम्ही तुम्हाला लवकरच रोम किंवा बर्लिनला पाठवायची व्यवस्था करतो, असं हुरुप देणारं उत्तर त्यांच्याकडून मिळालं."

त्यावर उत्तमचंदनी विचारले, "मग आता तुम्हाला माझ्या-कडून काय अपेक्षा आहे?"

"दोन गोष्टी तुम्ही आमच्यासाठी कराव्यात अशी अपेक्षा आहे." भगतराम उत्तमचंदकडे मोठ्या आशेने पाहात म्हणाले, "एक तर सुभाषबाबूंची एखाद्या सुरक्षित ठिकाणी रहावयाची व्यवस्था करावीत आणि दुसरं म्हणजे रशियन वकिलातीशी

संधान जुळवून द्यावं. सुभाषबाबूंना बर्लिन वा रोमबद्दल विशेष आकर्षण नाही. त्यांची मॉस्कोला जाण्याची उत्कट इच्छा आहे."

"तुमची पहिली अपेक्षा पूर्ण करण्याची मला फार इच्छा आहे. मी माझ्या घरातच त्यांची सोय करावी असे मला वाटतं. पण माझं घर त्या दृष्टीने सुरक्षित नाही. आम्ही पहिल्या माळ्यावर राहतो. तळमजल्यावर एक पेशावरचा कापडाचा व्यापारी राहतो." आशेनं पाहणाऱ्या भगतरामकडे पाहून उत्तमचंद पुढे म्हणाले, "पण माझं घर 'हिंदू गुजर' वस्तीत आहे. काबूल शहर हे आधीच गलिच्छ शहर आणि आमची वस्ती तर त्याहून गलिच्छ. अशा ठिकाणी मी सुभाषबाबूंना कसं ठेवू ?"

भगतराम हसून म्हणाले,

"अहो, काय भलतीच शंका काढता ? सध्याच्या अडचणीच्या स्थितीत स्वच्छास्वच्छतेचा विचार कसला करायचा ? अडचण ती नाही. तुमचा शेजारी कसा आहे ते सांगा."

काहीसा विचार करून उत्तमचंद म्हणाले, "माझा एक मुसलमान मित्र आहे, हाजीसाहेब. सत्तर वय आहे त्याचं. त्याची बायको जर्मन होती. त्यांनी पूर्वायुष्यात जगभर प्रवास केलेला आहे. तो इंग्रजांचा अगदी कट्टर शत्रू आहे. तो आमच्या पेशावर भागातलाच राहणारा. त्याचं घर फार सुंदर आहे. त्यानं आपल्या घरात हातमोजे-पायमोजे बनवण्याचं यंत्र बसवलंय."

मग हलक्या आवाजात उत्तमचंद पुढे म्हणाले,

"त्या हाजीसाहेबांना सुभाषबाबूंचा फार अभिमान आहे. सुभाष म्हणजे भारताचा सिंह आहे सिंह असं गौरवानं म्हणतात ते. म्हणून मला वाटतं, हाजीसाहेब सुभाषबाबूंना आपल्या घरी नक्कीच ठेवून घेतील."

"हो, पण त्यांनी नकार दिला तर ?" भगतरामने भयभीत होऊन विचारले.

"अहो, तसं झालं तर माझं घर आहेच की !" उत्तमचंदांनी भगतरामला आश्वस्त केले. चिंताग्रस्त सुरात भगतराम म्हणाला,

"हे बघा. काय वाटेल ते झालं तरी आज संध्याकाळच्या आत सुभाषबाबूंना त्या सराईतून हलवावंच लागेल. मला तिथं फार धोका वाटतोय."

"ठीक आहे. आज दुपारी ४ वाजता तुम्ही या." उत्तमचंद म्हणाले.

"सुभाषबाबूंना घेऊनच येतो" भगतराम पुढे म्हणाला, "पण माझं इथलं नाव रहमतखान आणि सुभाषबाबूंचं जियाउद्दीन आहे हे लक्षात ठेवा बरं का !"

भगतराम गेल्यावर उत्तमचंद पुन्हा विचारात पडले. हाजीसाहेब ठेवून घेतात की नाही त्याचा सोक्षमोक्ष लावावा या हेतूने ते हाजीसाहेबांकडे जायला निघाले.

हाजीसाहेब घरी नव्हते. तथापि उत्तमचंद परत जात असताना त्यांना ते वाटेत भेटले. रस्त्याच्या एका कडेला नेऊन उत्तमचंदनी हाजीसाहेबांना विचारले, "भारतातला एक राजकारणी गुप्तपणे इथे काबूलला आलायं. त्याला तुम्ही थोडे दिवस आपल्याकडं आश्रय देऊ शकाल काय ?"

हाजीसाहेबांनी कानावर हात ठेवत म्हटले "उत्तमचंद तू सीधा माणूस आहेस. युरोपात असताना अनेक हिंदी क्रांतिकारकांना मी पूर्वी मदत केलेली आहे. माझा अनुभव असा की त्यातून निष्पन्न काहीच झाले नाही. मी मात्र अडचणीत आलो. भारतीय

क्रांतिकारक विश्वास ठेवण्याच्या पात्रतेचे नाहीत असं माझं मत बनलं. म्हणून आता प्रत्यक्ष परमेश्वर आश्रय मागायला आला तरी त्याला देखील घरात घ्यायचं नाही असं मी ठरवलंय. शिवाय आता माझं वयही झालंय. कशाला या राजकारणाच्या भानगडीत पडायचं? "

उत्तमचंदनी बऱ्याच इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या व निरोप घेण्याआधी हलकेच हाजीसाहेबांना विचारले,

" पण भारतातला कोणता माणूस इथं आश्रयाला आलाय हे न विचारता एकदम नकार कसा काय देता ? "

" कोण आहे तो माणूस ? "

" फार मोठा माणूस आहे."

" अरे जा. सुभाष बोस तर इथं येणे शक्य नाही." हाजीसाहेब उद्‍गारले.

" समजा सुभाष बोसच आले असतील तर ? "

हाजीसाहेब एकदम स्तम्भित झाले. त्यांची जीभ जणू टाळूला चिकटली. डोळे विस्फारून रुद्ध कंठाने ते पुटपुटले,

" काय ? सुभाष बोस ? "

" होय सुभाष बोस. मूर्तिमंत सुभाष बोस ! मग आता काय म्हणताय ? "

" काय म्हणणार ? सुभाष बोसना माझ्या घरात ठेवून घ्यायला मी तयार आहे." जरा घुटमळून हाजीसाहेब पुढे म्हणाले,

" पण उत्तमचंद, माझं घर त्यांच्या दृष्टीने सुरक्षित आहे का ? असं बघ, घरात पायमोजाचा माग आहे. सात आठ नोकर घरभर वावरत असतात. बरीचशी गिऱ्हाइके देखील वाटेल तेव्हा घरात

शिरतात. अशा वेळी कुणी सुभाषबाबूंना ओळखलं अन् काही दगाफटका झाला तर ?"

हाजीसाहेबांचा युक्तिवाद उत्तमचंदना पटला आणि उत्तमचंदनी सुभाषबाबूंना आपल्या घरीच ठेवून घ्यायचे ठरविले.

ठरल्याप्रमाणे दुपारी ४ वाजता भगतराम उत्तमचंदच्या दुकानी पोचला. उत्तमचंदनी विचारले, "सुभाषबाबू कुठं आहेत ?"

"काबूल नदीच्या पलीकडच्या तीरावर"

उत्तमचंद त्या दिशेने पाहू लागले. म्हणाले, "तिथं तर सुभाष बाबूंसारखं कोणीच दिसत नाही. कोणी एक पठाण मात्र दिसतोय."

"तेच सुभाषबाबू" भगतराम हसून म्हणाला.

उत्तमचंदनी दुकान बंद केले. घरी जाऊन दोन पाहुणे जेवायला आहेत असा निरोप अमरनाथबरोबर पाठवला व मग भगतराम बरोबर ते पूल ओलांडून पलीकडे गेले.

कचेऱ्या सुटायची ही वेळ असल्याने पूलावर बरीच रहदारी होती. भगतरामच्या इशाऱ्यासरशी सुभाषबाबू उत्तमचंदच्या दिशेने निघाले. पठाणाचा वेष, काळी कुळकुळीत दाढी तर होतीच. शिवाय खांद्यावर एक मळकट चादर होती. पठाणी फेट्याचा एक पदर पुढे व एक मागे लोंबत होता. रस्त्यावर साठलेल्या दोन फूट उंचीच्या बर्फातून चालत आल्याने पायमोजे भिजले होते.

उत्तमचंदच्या मनात आले खरोखरच हे सुभाषबाबू असतील का ? पण विचार करायला वेळच नव्हता. भगतरामने खूण केल्यावर उत्तमचंद घराच्या दिशेने चालू लागले. त्यांच्या मागून

भगतराम आणि भगतरामच्या मागोमाग काही अंतर सोडून सुभाषबाबू असे चालू लागले. तिघांचा काही परस्परसंबंध आहे असा संशयही कुणाला आला नसता.

पूलापासून उत्तमचंदांचे घर एक मैलावर होते. रस्त्यात खड्डे होते. शिवाय बर्फ. रस्ता धड दिसतही नव्हता. सुभाषबाबू अगदी कष्टाने पावले टाकत होते. उत्तमचंदाच्या घराकडे जाणारी गल्ली बाजारपेठेलाच फुटलेली होती. खड्डे आणि बर्फ यामुळे गल्लीतली सडक फारच खराब झाली होती. सुभाषबाबूंचा पाय एका खड्ड्यात खूप खोल जाऊन त्यांचा तोल गेला. तेवढ्यात उत्तमचंदनी त्यांना सावरले. रस्त्यात त्यांना एक शेजारी भेटला. शेजाऱ्याने म्हटले, "अरेरे गरीब बिचारा! कुठून आलाय कुणास ठाऊक?"

उत्तमचंदच्या मनात आले, आता ही शेजाऱ्याची ब्याद कशी टाळायची? त्या शेजाऱ्याने चोंबडेपणा केलाच, "भाईजी कुठल्या धर्मशाळेत जायचंय तुम्हाला?"

उत्तमचंद चिडून म्हणाले, "आपल्याला काय करायचंय तो कुठून आला अन् कुठं जाणार आहे ते? थंडी केवढी पडलीय. इथं रस्त्यात विचारपूस करायला तरी वेळ आहे का?"

उत्तमचंद पुढे सरकल्यावर तो शेजारी देखील पुढे निघून गेला. मग उत्तमचंद बूटाचा बंद बांधण्याच्या निमित्ताने मागे रेंगाळले. अन् भगतराम व सुभाषबाबू जवळ आल्यावर चालू लागले. थंडीच्या कडाक्यामुळे लोक दारे बंद करून घरात शेगड्यांजवळ बसले होते ते यांच्या पथ्यावरच पडले. आसपास कोणी पाहात नाही ना हे न्याहाळून तिघेजण पटकन् घरात शिरले व त्यांनी दार बंद करून घेतले.

पहिल्या मजल्यावरील आपल्या खोलीत शिरताच उत्तमचंदनी कोळशाची पेटलेली शेगडी खोलीत आणवली व घरात चहा करावयास सांगितले. मग सुभाषबाबूंना विचारले,

"गरम गरम पाण्यानं आंघोळ करणार काय ?"

"नको आता. उद्या सकाळीच व्यवस्थित आंघोळ करीन. काबूलमध्ये आल्यापासून गेल्या तेरा दिवसात अंगाला पाण्याचा स्पर्श झालेला नाही."

उत्तमचंदनी आपला कुडता व सलवार देऊन सुभाषबाबूंना ओले कपडे बदलायला लावले. मग त्यांनी आपला चष्मा काबूलमध्ये आल्यानंतर पहिल्यांदाच डोळ्यावर चढवला. आता मात्र ते परिचयाचे सुभाषबाबू वाटू लागले.

गरम गरम चहा पिताना उत्तमचंद त्यांना म्हणाले, "माझ्या गरीबाच्या घरात तुमची गैरसोय झाली तर क्षमा करा."

त्यावर सुभाषबाबू म्हणाले,

"अहो काय वेडे की काय तुम्ही ? काय हालात राह्यलोय आम्ही ! अडचणीच्या काळात तुम्ही एवढं करताय तें कालत्रयी विसरता येणार नाही. मला तर मी माझ्याच घरात आहे असं वाटतय."

सराईतून भगतराम व नेताजी यांचे सामान आणायचे होते. ते सुद्धा अफगाण गुप्त पोलिसाला चुकवून. भगतराम बरोबर उत्तमचंदनी अमरनाथला दिले व गुपचुप झुकांडी देऊन सामान घेऊन या असे सांगितले.

"कुणी पाठलाग करत नाही ना हे नीट पहा. नाहीतर नुसतेच भटकत रहा. नजरा चुकवून इथे या" नेताजींनीही इशारा दिला.

ते दोघे गेल्यावर सुभाषबाबूंना आराम करायला सांगून उत्तमचंद घरात जेवणाची व्यवस्था कुठवर आलीय ते बघायला स्वयंपाक-घरात गेले. त्यांची पत्नी रामोदेवी अगदी घाबरलेली त्यांना दिसली. तिने जरा रागानेच विचारले,

" हे कोण पाहुणे आणले आहेत हो आज घरात ? "

" अग, आपल्या पेशावरच्या बाजूचेच आहेत. एकदा आपल्या घरी देखील आले होते. तुला आठवत नाही वाटतं ? "

" मुळीच नाही. मी कधीच या आधी त्यांना पाह्यलेलं नाही. हे बघा, तुम्ही खोटं बोलताय. ते मुसलमान आहेत ना ? अमरनाथनं मला सर्व सांगितलंय."

उत्तमचंदना माहीत होते, अमरनाथ लावालावी करण्यात वाकबगार होता. त्यांनी जरा आवाज चढवून विचारले,

" काय सांगितलं तुला अमरनाथनं ? "

" तो बिनदाढीचा माणूस आज सकाळीच तुमच्या दुकानात आला होता. त्यानं मुसलमानी सलाम तुम्हाला केला होता. तो तुमच्याशी पुश्तुत बोलत होता. मग तुम्ही अमरनाथला चहा आणायला पाठवलेत. अमरनाथनं चहा आणल्यावर मग हिंदुस्थानीत बोलू लागला. सर्व काही अमरनाथनं मला सांगितलं. बोला नं ? हे खोटं आहे काय ? "

रामोदेवीनं कमरेवर हात ठेवून लढाईच्या पवित्र्यात विचारले. उत्तमचंदनी ठरवले होते की सुभाषबाबू थोडेच दिवस काबूलला राहणार आहेत. तेव्हा रामोदेवीला ते रहस्य सांगायचे नाही. पण आता रामोदेवीचा रागरंग बघून त्यांनी सर्व काही सांगायचे

ठरवले व म्हटले, "ठीक आहे. सांगतो मग काय ते. पण जेवणाचे आधी बघ!"

सुभाषबाबू आराम करीत होते. थोड्या वेळातच भगतराम आणि अमरनाथ सराईतून सामान घेऊन सुखरूप परत आले. त्यांना वाटेत काहीच त्रास झाला नाही. मग सर्वजण सुखाने जेवले आणि भारताची नभोवाणी ऐकली. हा वेळ पावेतो बरीच रात्र झाली होती. सुभाषबाबूंची झोपण्याची व्यवस्था करून उत्तमचंद आपल्या झोपण्याच्या खोलीत गेले. तेथे त्यांची पत्नी त्यांची वाट बघत जागत बसली होती. उत्तमचंदनी विचारले,

"हे काय? अजून तू जागीच?"

"कशी झोप येणार? या पाहुण्याची खरी हकीगत सांगायचं तुम्ही कबूल केलं आहे. ती ऐकस्तवर स्वस्थपणानं मला झोप येणारच नाही" रामोदेवी म्हणाली.

उत्तमचंदनी टाळाटाळ करायला सुरुवात केली. काहीबाही सांगून समजावण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे रामोदेवी जास्तच चिडली. रागाने आरडाओरडा करू लागली. तिच्या तोंडाला हात लावून उत्तमचंद म्हणाले, "गप ग! तिकडं त्यांनी कुणी ऐकलं तर?"

रामोदेवीने रागातच नवऱ्याचा हात बाजूला सारून म्हटले, "मला काय करायचंय त्यांनी कुणी ऐकलं तर? हे पहा, दिवस-रात्र घरात दडून बसणारे असले चमत्कारिक पाहुणे मला माझ्या घरात नकोत. तुमच्या गैरहजेरीत दुसऱ्या पुरुषाची व्यवस्था मी करणार नाही. शिवाय मुसलमान माणसं तर मला घरात चालणारच नाहीत. तुम्ही त्यांची व्यवस्था दुसरीकडं कुठंही करा."

आता मात्र उत्तमचंदांचा नाईलाज झाला. त्यांनी रामोदेवीला सर्व रहस्य सांगून म्हटले " एवढ्या थोर पुरुषाची व्यवस्था काही दिवस लावण्याचं भाग्य आपल्याला लाभलं हे काय कमी आहे ?"

रामोदेवी हादरली. तिचा भीतीने थरकाप उडाला. म्हणाली, "अहो, पण कुणाला हे समजलं तर आपण किती संकटात सापडू ? कल्पना करा काय होईल त्याची ! "

" हे बघ, काय वाट्टेल ते होवो. सुभाषबाबू आपल्या घरी आहेत याची गंधवार्तासुद्धा कुणाला लागता कामा नये! या भारत-रत्नाच्या रक्षणासाठी आपल्या पंचप्राणांचा कोट आपण उभा केला पाहिजे."

उत्तमचंदच्या बोलण्याने रामोदेवीचा धीर तर वाढलाच पण तिला जबाबदारीची जाणीवही झाली. इतकेच नव्हे तर नित्याच्या रटाळ जीवनात काही तरी रोमांचक घटना घडतेय; देशासाठी काही तरी करण्याची अमूल्य संधी आपल्याला मिळतेय आणि ती देखील केवळ योगायोगाने याची रामोदेवीला जाणीव झाली. तिच्या अंगात जणु वीरश्री संचारली. ती म्हणाली,

" तुम्ही आता चिंताच करू नका. त्यांच्या रक्षणासाठी प्राणांची देखील मी पर्वा करणार नाही. आपल्या मातृभूमीची सेवा करण्याची ही सुवर्णसंधीच माझ्यासमोर चालत आली आहे. ही संधि मी पकडली नाही तर मी अभागीच ठरेन. तुम्ही खुशाल त्यांना आपल्या घरी ठेवून द्या."

अशा प्रकारे रामोदेवीचे संपूर्ण सहकार्य लाभल्याने उत्तमचंद निर्धास्त झाले. आणि सुभाषबाबूंचे तिथले वास्तव्य देखील सुखाचे झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सुभाषबाबूंची सर्व व्यवस्था लावून निघता निघता उत्तमचंदना घराबाहेर पडायला बराच वेळ झाला. सुभाषबाबू अस्वस्थ झाले. त्यांनी विचारले, " उत्तमचंदजी तुम्ही रोज दुकानांत केव्हा जातां ? "

" दहा-साडेदहा वाजतां. "

" मग आतां तर १२ वाजून गेले. त्यामुळं कुणाला संशय आला तर ? असं नका करू. मी तुमच्या घरात आहे हे तुम्ही विसरून जा पाहू ! "

उत्तमचंद नेताजींच्या खोलीतून बाहेर पडले. त्यांनी खोलीचे दार बंद करून बाहेरून कुलुप लावले व किल्ली रामोदेवीकडे दली. दिवसभर सुभाषबाबूंच्या खोलीला बाहेरून कुलुप असे.

एक दिवस रात्री गप्पा मारता मारता उत्तमचंदनी विचारले,

" ब्रिटिशांच्या हातावर तुरी देऊन तुम्ही कसे निसटलात ते सांगा तरी ? ती रोमहर्षक कथा तुमच्या तोंडून ऐकायची फार इच्छा आहे."

सुभाषबाबू म्हणाले, " मॉस्कोला जाण्याचं स्वप्न फार दिवसा-पासून माझ्या मनात होते. दोन महिन्यांपूर्वी एक माणूस मला भेटला व म्हणाला तुम्हाला मॉस्कोला पोचवण्याची सर्व व्यवस्था मी करतो. तुमचे मॉस्कोशी राजकीय संबंधही जुळवून देतो. पण त्यावेळी माझी भारत सोडण्यासारखी स्थिती नव्हती. कलकत्ता कॉर्पोरेशनचे काही महत्त्वाचं काम मला तेव्हा पूर्ण करायचं होतं. शिवाय परिणामकारक वेषांतर करावयास आवश्यक असणारी माझी दाढी पुरेशी वाढली नव्हती."

त्यानंतर मग शिशिरने आपणास गोमोहला कसे सोडले व

आपण तेथून पेशावरमार्गे काबूलला कसे आलो ते सांगून सुभाषबाबू म्हणाले,

" जवळ पासपोर्ट नाही. रस्ते माहीत नाहीत. भाषा येत नाही. थंडीचा कडाका. अशा कित्येक संकटांना तोंड देऊन मी इथं आलो. तुम्ही आश्रय दिल्यानंतर सर्व संकटांचा परिहार झाला असंच मला वाटलं."

जेवण आटोपल्यावर उत्तमचंदनी नेताजीना विचारले.

" मग आता पुढचा काय कार्यक्रम आहे तुमचा ? "

" खरं तर मॉस्कोला जायची माझी फार इच्छा होती अन् अजूनही आहे. पण काबूलमधील रशियन वकिलाच्या दाराशी आम्ही गेल्यावर तेथील वकिलानं आम्हाला कसं धुडकावून लावलं हे तुम्हाला भगतरामनं काल सांगितलंच आहे."

" पण इटालियन वकिलानं तुम्हाला मदत करण्याचं आश्वासन दिलंय ना ? "

" हो तिथल्या सिनॉर करोनी (चार्ज द अफेअर्स )ला भगतराम भेटल्यावर त्यानं 'मी आजच रोमला व बर्लिनला सर्व हकीगत कळवून तुमच्या पासपोर्टची व्यवस्था करतो' असं म्हटलं व येथील हर टॉमस या जर्मन दुकानदाराशी संपर्क ठेवण्याची सूचना दिली. वकिलातीत जाणं तसं धोक्याचंही असावं." एक दीर्घ श्वास घेऊन नेताजी पुढे म्हणाले,

" मला मात्र रोम वा बर्लिनला जायची मुळीच इच्छा नाही. नाइलाजापोटीच मला त्यांची मदत घ्यावी लागणार आहे. पण अजूनही रशियन वकिलाकडून मला मदत मिळाली तर ती घ्यायला मला अधिक आवडेल. तुम्ही बघा ना तुमची काही ओळख तिथं निघतेय का ? "

"नाही हो ! एवढी वर्षं काबूलमध्ये राहूनही रशियन वकिलातीशी माझा कधी संबंधच आला नाही. कारण राजकारण हे काही माझं क्षेत्र नव्हे. तथापि मी ओळख काढण्याचा प्रयत्न करून बघतो."

दोन दिवसांनी हर टॉमस यांच्या दुकानी भगतराम जाऊन आला. तेव्हा हर टॉमसने एक लखोटा त्याच्या स्वाधीन केला. ते सिनॉर कॅरोनीचे पत्र होते. त्याने लिहले होते, 'तुम्हाला म्हटल्या-प्रमाणे मी रोम व बर्लिनशी पत्रव्यवहार करून तुम्ही काबूलला पोचल्याचं कळवलं होते. हिंदुस्तानांतून मोठ्या हिकमतीनं निसटण्याच्या तुमच्या लोकविलक्षण पराक्रमाचं त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनी तुमचं अभिनंदन केलं आहे व तुम्हाला सर्वतोपरी मदत करण्याबद्दल कळवलं आहे.'

सुभाषबाबूंनी त्यांना उत्तर लिहिले, 'तुमचा संदेश मिळाला· आनंद वाटला. पासपोर्ट मिळवून देण्याबद्दल तुम्ही जी खटपट करीत आहात त्याबद्दल आभारी आहे. जितक्या लवकर तो मिळेल तितके बरे. कारण माझं इथलं वास्तव्य धोक्याचं आहे. बर्लिन व रोम येथील सदिच्छा व्यक्त करणाऱ्यांना माझा प्रणाम कळवा."

भगतराम उत्तमचंदना म्हणाला, 'घरात बसून बसून मला अगदी कंटाळा आलाय. मी पण तुमच्याबरोबर बाजार पेठेत येतो.' पण सुभाषबाबूंनी भगतरामला म्हटले, 'असलं धाडस करू नकोस. तो अफगाण गुप्त पोलिस तुला भेटला तर नसती आफत ओढवेल. उगाच संकटाला निमंत्रण नकोय.'

तेव्हा उत्तमचंद एकटेच सुभाषबाबूंचे पत्र घेऊन हर टॉमसला भेटायला गेले. त्या पत्रात सुभाषबाबूंनी पासपोर्टची चौकशी केली

होती आणि उत्तमचंद यांच्या रेडियोच्या दुकानी काय ते कळवावे असे लिहले होते. कारण वारंवार हर टॉमस यांच्या दुकानात चौकशी करणे आम्हाला प्रशस्त वाटत नाही असेही म्हटले होते.

त्याच दिवशी दुपारी हाजीसाहेब उत्तमचंदांच्या दुकानांत आले आणि अगदी हात जोडून त्यांनी विनंती केली, ‘सुभाषबाबूंना एकदा तरी मला माझ्या डोळ्यांनी बघू दे.’

उत्तमचंद म्हणाले, ‘मी त्यांना विचारतो व त्यांची संमती असेल तर उद्या भेट घडवीन.’

त्या रात्री आकाशवाणीवर विविध स्टेशने फिरवत असताना अचानक कलकत्ता स्टेशन लागले. बंगाली संगीताचे मधुर स्वर वातावरणात गुंजू लागले. सुभाषबाबू एकदम तल्लीन झाले. पण क्षणातच शुद्धीवर येऊन त्यांनी ते स्टेशन बंद करावयास उत्तमचंदना सांगितले.

‘किती गोड आहे हे बंगाली संगीत!’ उत्तमचंद म्हणाले.

‘खरंय ते! मलाही ऐकावंस वाटतय. पण हा मोह आवरलाच पाहिजे. इथं बंगाली जाणणारा कुणीतरी आहे असा संशय शेजाऱ्यांना येईल व त्यामुळं घात होईल.’ व्यथित मनाने सुभाषबाबूंनी उत्तमचंद यांची समजूत काढली.

उत्तमचंदांनी त्यांना हाजीसाहेबांच्या विनंतीविषयी सांगितले. त्यांनी संमती दिली. ६ फेब्रुवारीला आम्ही सर्व जण मजेत व्हरांड्यात चहा पीत बसलो होतो. उत्तमचंदनी आपल्या मुलीला दार बंद करण्याची कायमची सूचना दिली होती. पण ती त्या दिवशी दार बंद करायला विसरली. तळमजल्यावरचा शेजारी ‘क्ष’ अनाहूतपणे येऊन टपकला. वरच्या गच्चीवर जाण्याचा रस्ता

व्हरांड्यापुढचा होता. व्हरांड्याचे दार उघडे असल्याने तो ‘ क्ष ’ व्हरांड्यातून सरळ आत आला. तो आल्याची जाणीव होताच सर्वच दचकले. सुभाषबाबूंना पाहून ‘ क्ष ’ तर पांढराफटक पडला. त्याची बोबडी वळली. त्याने नेताजींना ओळखले होते यात शंकाच नव्हती. दार उघडे राहिले ही महाभयंकर चूक घडली. पण मागाहून काय करता येणार होते ?

उत्तमचंदनी मनोमन विचार केला की ‘क्ष’ ने जरी नेताजींना पाह्यले तरी दगा होणार नाही. कारण याच माणसाने कैकदा सुभाषबाबूंच्या पराक्रमाविषयी आदर व्यक्त केला होता. सुभाषबाबूंच्या त्या प्रसिद्ध चष्म्यानेच त्यांची ओळख घडवून दिली होती. ‘क्ष’ कमालीचा गलितगात्र झाला होता. त्यानंतर दिवसभर तो हगवणीने बेजार होऊन बेशुद्ध पडला असल्याची बातमी उत्तमचंदना कळली. त्याच रात्री हाजीसाहेब व सुभाषबाबू यांची भेट झाली.

७ फेब्रु. ला ‘क्ष’ उत्तमचंदना भेटून म्हणाला, “यापुढं या घरांत राहणे मला शक्य नाही. मी जागा सोडून जातोय. भाड्याची काळजी करू नका. भाडें मी नियमित देत जाईन.”

उत्तमचंदनी विचारले, “ पण असं एकाएकी घर सोडून जाण्याचे कारण तरी काय ? ”

“ या घरात पिशाच्चबाधा असावी असं मला भय वाटते. माझी प्रकृती त्यामुळेच एकदम बिघडली.” ‘क्ष’ म्हणाला.

“ छट् मला नाही खरं वाटत ! सत्य काय ते सांगा बघू ! ”

“ खरं सांगू,” ‘ क्ष ’ उत्तरला, “ माझ्या बायकोचा हे घर सोडण्याचा आग्रह आहे. तुमच्याकडे जे नवखे पाहुणे आलेत ना,


2066

तेव्हापासून ती घाबरलीय."

"हात्तीच्या. अहो ते आमच्या मुलुखातले आमचे नातेवाईक आहेत. त्यांना काय घाबरायचं? त्यातला एक तर आजारीच आहे. औषधोपचारासाठी मी त्याला इथं आणलाय. थोड्या दिवसांनी ते निघून जातील." उत्तमचंदांचा प्रयत्न नेताजी विषयीचा संशय घालवण्याचा होता. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. 'क्ष' म्हणाला,

"जाऊं द्या ना ती चर्चा! माझी प्रकृती किती बिघडलीय तुम्ही पाहताच आहा. त्यामुळंच मला इथं राहू नयेस वाटतं. यातच काय ते समजून घ्या."

एका दृष्टीने 'क्ष' घर सोडून गेला याचे उत्तमचंदना बरेच वाटले! पण दुसऱ्या दृष्टीने भयही वाटले. न जाणो! त्याने धोका दिला तर! म्हणून काही दिवसांसाठी उत्तमचंदनी भगतराम व नेताजी यांना एका सराईत नेऊन ठेवायचे ठरवले व एक खोली ठरवून लगेच त्यांना तेथे नेलेही. दोन-तीन दिवसांत काही विपरीत घडले नाही तर पुन्हा दोघांना घरी आणता येईल असा उत्तमचंदांचा हिशेब होता.

सायंकाळी 'क्ष'ची बायको उत्तमचंद यांच्या घरी चक्कर मारून गेली. तिने रामोदेवीकडून काही तलास लावण्याचा प्रयत्न केला. पण रामोदेवींनी साऱ्या घरात तिला हिंडवून पाहुणे निघून गेल्याची खात्री पटवली.

९ फेब्रुवारीच्या दिवशी इटालियन वकीलाची बायको सिनोरा करोनी उत्तमचंद यांच्या दुकानात आली आणि नेताजींना देण्यासाठी एक सीलबंद लखोटा तिने त्यांच्या हातात ठेवला. त्यात

लिहिले होते, ' सराई सोडून तुम्ही एका मित्राच्या घरी रहावयाला गेलात हे फार चांगले केलेत. यामुळे आमचे संदेश सरळ तुमच्या मित्राच्या दुकानीच पाठवू. रोम व बर्लिनला आम्ही तुमचा निरोप पाठविला आहे. अजून तुमच्या पासपोर्टची व्यवस्था झालेली नाही. आमचे प्रयत्न चालू आहेत. मॉस्कोमधील आमच्या वकिलातीला त्याबाबत व्यवस्था करावयाला आम्ही सांगितले आहे. त्यांच्या-कडून काय उत्तर येते ते तुम्हाला आम्ही कळवू.'

सुभाषबाबूंकडे तो लखोटा ते राहात असलेल्या सराईत उत्तम-चंदनी पाठवून दिला. १९ फेब्रुवारीला सकाळी उत्तमचंद बाजारात भाजी घ्यावयास गेले असता त्यांना अचानक ' क्ष ' भेटला. बरोबर धाकटी मुलगी होती. उत्तमचंदनी त्याला विचारले,

' काय भाई, एकदम कुठं अदृश्य झालात ? कालपासून तुम्हाला शोधतोय. पण तुमचा कुठंच पत्ता नाही. तुमच्या नव्या घराचा पत्ता तरी सांगा.'

' कसलं नवं घर घेऊन बसलात,' चिडक्या आवाजात ' क्ष ' म्हणाला, ' तिकडं गेल्यापासून तर माझं आजारपण वाढलंच.'

' हे बघ मित्रा !' ' क्ष 'चा हात पकडून उत्तमचंद म्हणाले, ' तुम्ही माझं घर सोडून का गेलात त्याचं कारण मला माहीत आहे. तुम्ही कबूल करणार नाही. पण सुभाषबाबूंना पाहून तुमची हबेलंडी उडाली. काय खरंय ना मी म्हणतोय ते ?'

" खरं आहे तुम्ही म्हणतायं ते," 'क्ष' ने कबुली दिली, " मी त्यांना ओळखलं अन् भयानं माझी घाबरगुंडी उडाली. ब्रिटिश-सरकार नेताजींसाठी आकाशपाताळ एक करणार आणि त्यांची पहिली धाड अफगाणिस्तानावर पडणार यात दुमत असण्याचं

कारण नाही. हिंदुस्तानातून मॉस्कोला पळून जाणारे बरेचसे भारतीय क्रांतिकारक अफगाणीस्तानांतून मॉस्कोला जातात हे जगजाहीर आहे. आणि या शोधात तुमच्या घरी सुभाष बोस सापडले तर तुमच्याबरोबर माझा व माझ्या संसाराचाही बळी पडल्यावाचून राहणार नाही, या भयापोटी मी तुमच्या घरातून पसार व्हायचे ठरवले."

"तुमच्या त्या उतावळचा कृत्यानं तुम्ही आम्हाला मात्र फार मोठा धोका निर्माण करून ठेवलात." उत्तमचंदांनी बतावणी केली. "सुभाषबाबूंना पाहून तुमची ती फटफटीत पडलेली चर्या व उडालेली त्रेधातिरपिट पाहून नेताजी खूपच रागावले. त्याच दिवशी ते घर सोडून निघून गेले. बिचारे कुठं भटकत असतील देव जाणे ! "

एवढचा मोठचा माणसाची सेवा करायची मिळालेली संधी गमावल्यामुळे होणारे दुःख उत्तमचंदांच्या चेहऱ्यावर उमटून दिसले. 'क्ष' चा चेहरा खर्रकन उतरला. खाली मान घालून तो म्हणाला, "भाई माझ्या हातून चुक झाली खरी पण आता ती दुरुस्त कशी करणार ? "

उतमचंद गंभीर चेहरा करून म्हणाले, 'माझं नशीब मोठं म्हणून असा महात्मा माझ्या घरी आला. अन् तुमच्या चुकीनं तो निघून गेला. कदाचित अजूनही ते काबूलमध्ये असतील. इथं जर त्यांना पकडलं तर त्याची सर्व जबाबदारी आणि पाप तुमच्यावर ! केवढं मोठं लांछन आहे हे मात्र लक्षात घ्या."

'क्ष' मेल्याहून मेल्यासारखा झाला. दुपारी बारा वाजता उत्तमचंद दुकानी गेले तेव्हा भगतराम त्यांना भेटला. बाजारचे

अन्न खाऊन सुभाषबाबूंना एकदम संग्रहणीचा विकार झाला असून ते अतिशय आजारी असल्याची बातमी त्याने दिली. तो पुढे म्हणाला, "काय करावं कळत नाही. डॉक्टरलाही बोलावून दाखवता येणार नाही. तुमचा सल्ला घ्यायला मी आलोय."

"सल्ला एकच. तत्काळ त्यांना घरी घेऊन या." उत्तमचंद म्हणाले "अशा आजारात त्यांना सराईत ठेवण्यानं दुखणं वाढेलच. घरच्या अन्नानं आणि घरगुती उपचारांनी ते बरे होतील अशी माझी खात्री आहे."

सायंकाळी साडेसात वाजता नेताजी आले तेव्हा त्यांचा चेहरा अगदी फिक्कट आणि ओढलेला दिसत होता. घरगुती उपायांनी व घरच्या अन्नाने ते थोड्याच दिवसात बरे झाले.

खालचे बिऱ्हाड गेल्याने आता काहींसे बिनधास्त वातावरण झाले होते. बर्फ पडण्याचेही थांबले होते. पण थंडी बरीच असल्याने दुपारच्या वेळी आसपासच्या बायका आपापल्या घराच्या पत्र्यावर येऊन उन्हात गप्पा मारीत बसत. रामोदेवी आपल्याकडच्या पाहुण्यांचा संशय येऊ नये म्हणून आटोकाट काळजी घेई. सुभाषबाबूंना खोकला आला की रामोदेवी जोराजोरात खोकायची. कारण नेताजींच्या खोकल्याचा आवाज कोणाला ऐकू येऊ नये.

एक आठवडा उलटला तरी इटालियन वकिलातीकडून काहीच निरोप येईना. शेवटी सुभाषबाबूंनी सिनॉर करोनीला पत्र लिहिले—

"मला इथं येऊन आता तीन आठवडे होतील. आणखी किती दिवस मी इथं रहावयाचं ! शक्य तितक्या लवकर माझ्या पासपोर्टची व्यवस्था करा."

सिनॉर करोनीचे उत्तर आलें,

" तुमची अडचण मला कळते पण माझा निरूपाय आहे. तुमच्या पासपोर्टबद्दल मॉस्कोतच काही तरी गडबड असावी असं मला वाटतं. एकदोन दिवसात काही तरी कळवतो."

दरम्यान उत्तमचंदनी रशियन वकिलातीशी सूत जमवण्याचा प्रयत्न करून पाहृयला. पण काहीच जमेना. शेवटी एक दिवस काबूलच्या रशियन वकीलांना सुभाषबाबूंनी एक लांबलचक पत्र लिहिले व त्यांच्या प्रत्यक्ष भेटीची मागणी केली. पण ते पत्र सुभाषबाबूंच्या खिशात तसेच पडून राहृयले. कारण रशियन वकीलाच्या हातात ते देण्यास कोणी रशियन वा जर्मन माणूस मिळेना. त्यावेळी रशिया व जर्मनी यांची दोस्ती होती.

दोन दिवसांनी सिनोरा करोनीने इटालियन वकीलाचे पत्र आणून दिले. त्यात लिहले होते, " पासपोर्ट मिळण्याबाबत मॉस्कोमध्ये काही गडबड आहे. असो. पूर्वी आम्हाला आलेला संशय खरा ठरला. मॉस्कोतील अक्ष राष्ट्रांच्या (ॲक्सिस) वकिलाती सुभाषबाबूंना बर्लिन किंवा रोमला रशियातून जाण्यासाठी परवानगी मिळविण्याची खटपट करीत होत्या. पण तशी परवानगी रशिया देत नव्हता. पण मग बऱ्याच मिनतवारीने अखेरीला रशियाने त्यांची ती विनंती मान्य केली. आता रोमहून तुमच्यासाठी काही राजदूत येतील. ते आल्यावर तुमच्या पासपोर्टची व्यवस्था होईल. फार विलंब यासाठी लागणार नाही. "

पण एक आठवडा गेला तरी काहीच हालचाल होईना. घरात बसून बसून नेताजी अगदी कंटाळून गेले होते. एक दिवस ते म्हणाले, " काबूलच्या बाजार पेठेत भटकून यावंस वाटतंय. "

पठाणी कपड्यांखेरीज सुभाषबाबूंकडे कपडे नव्हते. उत्तमचंदनी त्यांना स्वत:चा ' फ्लॅनेल ' चा सूट दिला. तो त्यांना अगदी बरोबर

झाला. डोक्याला त्यांनी उत्तमचंदांची अफगाणी टोपी घातली. आता ते अगदी एखाद्या अफगाणी नागरिकासारखे दिसू लागले. भगतरामला आता काबूलच्या बाजारची चांगलीच माहिती झाली होती. सुभाषबाबूंना बूट खरेदी करायचे होते. दोघांनी बुटांची जोडी खरेदी केली आणि मनसोक्त हिंडून फिरून दोघे उत्तम-चंदांच्या दुकानात आले आणि तेथून घरी परतले.

रात्री गप्पा मारताना नेताजी म्हणाले, "ज्या दुकानातून मी बूट खरेदी केले तो दुकानदार हिंदी होता. आमच्या बोलण्यावरून त्याने ताडले की आम्ही हिंदी आहोत. विचारले, "तुम्ही हिंदी आहात काय ?" मी म्हणालो, "हो मी हबीबिया कॉलेजमध्ये प्रोफेसर आहे. माझं नाव जियाउद्दीन" आश्चर्याने तो म्हणाला, "इथले सर्व हिंदीचे प्राध्यापक मला माहीत आहेत. पण तुमचं नाव मी कधी ऐकलं नाही किंवा तुम्हाला कधी पाहिल्याचंही आठवत नाही." मी त्याला म्हणालो, "कसं आठवणार ? अहो, माझी नुकतीच इथं नेमणूक झाली आहे. अजून या देशाची भाषा मला येत नसल्यानं मी फारसा कुठं बाहेरही पडत नाही." "आमच्याकडं एकदा चहाला याल कां ?" मोठ्या प्रेमाने त्या दुकानदाराने मला विचारले. मग त्या कटकटीतून सुटण्यासाठी मी म्हणालो, "सध्या तर मी फार कामात आहे. सवडीनं बघीन." त्याला कटवून दुकानाबाहेर पडता पडता माझ्या मनात आले याच्याशी अधिक बोलणे धोक्याचेच आहे. उद्या आपला शोध घ्यायला हबीबिया कॉलेजमध्ये हेलपाटे मारीत सुटायचा ! त्या कल्पनेने मला हसू फुटले."

एक दिवस उत्तमचंदनी नेताजींना विचारले, "मॉस्कोला जाण्याचा तुमचा मुख्य हेतू काय आहे ?"

नेताजींनी उत्तर दिले, " रशिया व जर्मनी यांचा नुकताच अनाक्रमणाचा करार झाला आहे. जर्मनीनं ब्रिटनशी युद्ध पुकारलं आहे. रशिया हा ब्रिटनचा शत्रू आहे. म्हणून मॉस्कोत जाऊन भारतीय स्वातंत्र्याचा प्रचार करण्याची वेळ आहे."

उत्तमचंद म्हणाले, " जर्मनी आणि रशिया आज जरी दोस्त वाटत असले तरी त्यांची ही मैत्री फार काळ टिकेल असं वाटत नाही. कारण या दोन राष्ट्रांच्या विचारसरणीत काहीही साम्य नाही. शिवाय ब्रिटनविरोधी प्रचार करायला रशिया तुम्हाला परवानगी देईल का ?"

" तुम्ही म्हणता ते बरोबर आहे, " नेताजी उत्तमचंदना दुजोरा देत म्हणाले, " उद्या कदाचित् रशिया आणि जर्मनी ह्यांच्यामध्ये युद्ध सुरु होईल. आज राजकीय परिस्थिती इतकी झपाटच्यानं बदलत आहे की पुढील चोवीस तासात काय होईल हे या क्षणी सांगता येणार नाही. रशिया व जर्मनी यांच्यात तह होईल असं तरी कोणाला वाटलं होतं ? शिवाय काही असलं तरी ब्रिटिश हे काही रशियाचे मित्र नव्हेत. म्हणून ब्रिटनविरोधी प्रचार करण्याची मोकळीक मला रशियात मिळेल असा माझा विश्वास आहे."

" पण केवळ प्रचाराने भारताला स्वातंत्र्य मिळेल असं वाटतं तुम्हाला ? " उत्तमचंदनी शंका व्यक्त केली.

सुभाषबाबू ठामपणे उत्तरले, ' हिंसात्मक क्रांती करून ब्रिटिशांची हिंदुस्थानातून उचलबांगडी केल्याखेरीज ते हिंदुस्थान कधीही सोडणार नाहीत अशी मात्र माझी खात्री आहे. कोणत्याही देशाला त्यांनी शांततेच्या मार्गानं स्वातंत्र्य दिलेले नाही. आयर्लंडचं उदाहरण बघा. आशरिय लोक तर त्यांच्याच रक्ताचे आणि वंशाचे आहेत ना ?'

दुःखाने दीर्घ श्वास घेऊन नेताजी पुढे म्हणाले, ' पण सातशे वर्षं सतत प्राणपणानं निकराचा लढा दिल्यावरच त्यांना अखेर स्वातंत्र्य मिळालं. पण ते देतानाही ब्रिटननं ' अल्स्टर 'चा तुकडा तोडलाच. मग हिंदुस्थानला ते आपण होऊन स्वातंत्र्य कसं देतील ? परदेशांत ब्रिटनविरोधी केवळ प्रचार करून आपल्याला स्वातंत्र्य मिळवता येणार नाही हे तुमचं म्हणणं मला मान्य आहे. पण सध्या ब्रिटन जीवनमरणाच्या लढाईत गुंतलं आहे. अशा वेळी त्यांच्याविरुद्ध केलेला प्रचार त्यांना नुकसानकारक नक्कीच होईल.'

' पण आयर्लंडप्रमाणं भारतात आपणास क्रांति का करता येऊ नये ?' उत्तमचंदनी विचारले.

' ब्रिटिशांनी भारतात अशी परिस्थिती निर्माण केलीय की तिथं अशी क्रांति करणं आज तरी शक्य नाही. ब्रिटिशांना हिंदुस्थानातून हाकलून देण्यासारखं वातावरण त्या ठिकाणी निर्माण करण ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. शिवाय परकीय सत्तेच्या मदतीशिवाय अशी क्रांति घडवून आणता यावयाची नाही. खुद्द रशियानं देखील आपल्या देशातील क्रांति जर्मनीच्या मदतीनचं घडवली आणि अमेरिकेनं सुद्धा फ्रान्सच्या मदतीनंच आपलं स्वातंत्र्य मिळवलं, ' नेताजींनी उत्तमचंदाचे शंका निरसन केले.

' याचा अर्थ भारत–मुक्तीसाठी तुम्ही रशियाचं सहाय्य मिळवू इच्छिता ?' उत्तमचंद उद्गारले.

' अर्थात्च. तोच माझा हेतू आहे.' सुभाषबाबूंनी कबूली दिली; ' मदत करण्यासाठी रशियाचे मन वळवावयाचं आहे. मी हिंदुस्थानात राह्यलो असतो तर युद्ध संपेपर्यंत इंग्रज सरकारनं मला तुरुंगात ठेवलं असतं. मी भविष्यच सांगतो तुम्हाला की मोठ-

मोठ्या राजकीय भारतीय पुढाऱ्यांना ब्रिटिश सरकार लवकरच स्थानबद्ध करील. अन् म्हणूनच तुरुंगात सडत पडण्यापेक्षा मी देशाबाहेर पडून देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणं मला अधिक इष्ट वाटलं.'

'इथून तुम्हाला मॉस्कोला जायची परवानगी मिळालीच नाही तर तुम्ही काय कराल ?' उत्तमचंदांच्या या प्रश्नाला नेताजींनी उत्तर दिले, 'रोम वा बर्लिनला जाताना मॉस्कोमध्ये उतरून तिथं राहण्याचा माझा विचार आहे.' त्यात यश मिळालं नाही तर बर्लिन किंवा रोममधील रशियन वकिलाती मार्फत तशी खटपट करून पाहीन. परदेशी वकिलातीमध्ये जास्त मोकळेपणानं आपण बोलू शकतो'

'अक्ष राष्ट्रे तुम्हाला मॉस्कोमध्ये राहू देतील की नाही ह्याची मला शंका वाटते. तुमच्या सारखा थोर हिंदी नेता आपल्या हाती लागल्यावर ती राष्ट्रे स्वतःसाठीच तुमचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतील. तुमचा फायदा ते रशियाला काय म्हणून घेऊ देतील ?'

'तुमचं म्हणणं बरोबर आहे. पण माझा खरा ओढा मॉस्को-कडेच आहे भारतीच्या स्वातंत्र्याला मदत करू शकणारं असं तेच एक राष्ट्र आहे. अन्य कुणाजवळ तेवढं सामर्थ्य नाही. म्हणून माझा जीव तिथं जाण्यासाठी तळमळतोय. या महायुद्धात हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालं नाही तर पुढं कधी मिळेल सांगता येत नाही.'

"हिंदुस्थानातील धार्मिक तंटे कसे मिटणार ?" उत्तमचंदांच्या प्रश्नाला नेताजींनी उत्तर दिले,

'जोवर हिंदुस्थानात इंग्रजांची तिसरी पार्टी आहे तोवर धार्मिक सलोखा अशक्य आहे. इंग्रज ते तंटे वाढवीतच राहणार. एखाद्या

पोलादी हुकूमशहाचा वरवंटा फिरल्याखेरीज हे झगडे मिटणार नाहीत. हिंदुस्तानात एकच दुखणं आहे का ? अनेक राजकीय व्याधी आहेत. भारताला कमाल पाशासारख्याची गरज आहे.'

'येथल्या रशियन वकिलानं मदत करण्याचं का बरं नाकारलं असावं ?' उत्तमचंदनी विचारलं.

"मला बोलावण्याला सोव्हिएटचा विरोध असावा." जरा विचार करून सुभाषबाबू पुढे म्हणाले, "कदाचित इथल्या रशियन वकीलाला मॉस्कोचं धोरण कळलंही नसावं. मध्येच मी अक्ष राष्ट्रांच्या तावडीत सापडला जाईन असेही रशियाला वाटलं असेल. अन्यथा माझा स्वीकार करायला रशिया तयार नसेल असं मला वाटत नाही."

सुभाषबाबूंच्या मनात अक्ष राष्ट्रांबद्दल नाराजी होती. किंबहुना ब्रिटिशांइतकीच अक्ष राष्ट्रांबद्दलही त्यांना घृणा होती.

या वैचारिक चिंतेत एक आठवडा उलटला तरी इटालियन वकिलातीकडून काही निरोप आला नाही. आता नेताजी खरोखरच वैतागले.

एकदा हाजीसाहेबांनी त्यांना चहाला बोलावले. त्या भेटीनंतर वारंवार ते हाजीसाहेबांकडे जाऊ लागले. एक दिवस निराशेने म्हणाले, "काय वाटेल ते करून या कोंडीतून मला सुटलंच पाहिजे. रशियन सरहद्दीपर्यंत पोचवणारा एखाद्या वाटाड्या मला मिळवून द्या. एकदा त्या हद्दीत गेल्यावर कदाचित ते मला पकडतील. मग रशियन तुरुंगातूनच मी मॉस्कोशी संधान बांधू शकेन"

"वाटाड्या मिळेल हो ! पण वाटेत फारच धोके आहेत." उत्तमचंदनी उत्तर दिले.

" आताच्या परिस्थितीपेक्षा तर जास्त नाहीत ? रशियन तुरुंगात जायची माझी तयारी आहे."

रशिया व अफगाणिस्तान यांच्या सीमेवर हँगो नावाची एक नदी आहे. महाकीर नावाचा एक भयंकर डाकू उत्तमचंदांच्या परिचयाचा होता. मूळ तो वायव्य सरहद्द प्रांतातला. पण तिकडे एक खून करून तो वीस वर्षांपूर्वी इकडे पळून आला होता. तो लॉरी ड्रायव्हर म्हणूनकाम करीत असताना हँगो नदी काठावरील पानकेसर गावी कित्येकदा जाऊन आला होता. त्याला त्या भागाची चांगली माहिती होती. ती नदी ओलांडणे अगदी सोपे आहे असे उत्तमचंदना तो म्हणाला होता.

महाकीर एके काळचा डाकू असला तरी दोस्तीला इमानदार होता. अलीकडे तो बेकार होता. सणाच्या वा जत्रेच्या वेळी जुगार वा तत्सम काही तरी उपद्व्याप करून तो पैसे मिळवीत असे. उत्तमचंदना वाटले महाकीरची मदत नेताजींना रशियात पोचवण्यासाठी घ्यावी.

तो अधून मधून उत्तमचंदच्या दुकानी येऊन काबूलमधील भानगडी व अफवा यांची माहिती मनोरंजकपणे सांगे. असाच एकदा तो आला असता उत्तमचंदनी त्याच्यापाशी हँगो नदीविषयी गप्पा सुरू करून विचारले,

'काय रे ! या बाजूला राहणारे लोक नदी ओलांडून चोरून रशियात जात असतील ना ?'

'पुष्कळ ! तिथं सोन्याचा आणि कोकरांच्या चामड्याचा चोरटा व्यापार खूप चालतो. चोरटा व्यापार करणारा माझा एक मित्र आहे. तो तर खूपदा रशियात जाऊन आलाय.'

‘मग एखाद्याला रशियांत पळून जायचं असेल तर तशी व्यवस्था करता येईल?’ उत्तमचंदनी विचारले. महाकीर म्हणाला,

‘फार सोप आहे ते! तुम्हाला जायचंय का! मी घेतो जबाबदारी तुम्हाला तिकडं पोचवण्याची.’

‘छे! छे! माझं काय काम आहे तिथं जायचं? पण माझा एक मित्र यायचाय इथं. त्याच्याजवळ पासपोर्ट नाही. त्याला मात्र तिथं जायचंय. तू मदत करशील?’

‘नक्की. अशा कामात मदत करायला माझ्यापेक्षा अधिक विश्वासू माणूस तुम्हाला मिळायचाच नाही.’

‘हँगो नदीवर पूल आहे का?’

‘आहे. पण तिथं पासपोर्ट लागतो. म्हणून चोरून नदी ओलांडायची तर कातड्याच्या पोकळ पिशव्यांची सांगड बांधून त्यावरून पलीकडं जावं लागतं.’

‘तसं करताना पकडलं जाण्याची शक्यता असेल नाही?’ उत्तमचंदनी प्रश्न केला.

‘अहं. आजवर तरी तसं घडलेलं नाही.’ महाकीरने सावधपणे म्हटले,

‘हे पहा. माझ्या मित्राच्या बाबतीत धोका पत्करायला मी तयार नाही. त्याच्या जन्माचा नाश होईल. कदाचित् तुलाही जन्मभर तुरुंगात राहावं लागेल. नीट विचार करून उत्तर दे.’

‘सांगितलं ना काळजी करू नका म्हणून,’ निश्चितपणे महाकीर म्हणाला, ‘खुदावर विश्वास ठेवा अन् कामाला लागा. काय हो, तुमच्या या मित्राला पुश्तु किंवा फारसी भाषा येते का?’

" नाही हो, त्याला इथली कोणतीच भाषा येत नाही. पण त्याच्याबरोबरच्या दोस्ताला दोन्ही भाषा येतात."

" छान ! मग त्याला आपण हाजी बनवून उझबेकी वेष चढवू. नाझर शरीफचे ते यात्रेकरू असं नाटक करायचं. एक रात्र नाझर शरीफच्या दर्ग्यात रहायचं अन् दुसऱ्या दिवशी 'बुखो' ला जायचं. तिथं माझा मित्र आहे. तो पुढची सर्व व्यवस्था करील."

" कोणालाच उझबेकी भाषा येत नाही. म्हणून पठाणी वेषातच गेलेलं बरं. त्यांच्यापैकी एकाला पुश्तु येत. बरं खर्च काय येईल?"

" लॉरीचं भाडं अन् प्रवासात काय येईल तो ! मित्राच्या घरी एक दिवस थांबावं लागेल. त्याला एक चप्पल जोड व एक लुंगी दिलीत की तो खुष होईल."

" बरं तुला काय द्यायचं ? "

" मला सहा सातशे अफगाण रुपये दिलेत की झालं."

" ठीक आहे. आधी तीनशे व ते तिथे पोचल्यावर त्यांची चिठ्ठी आली की उरलेले."

उत्तमचंदनी महाकीरशी झालेले बोलणे सुभाषबाबूंना सांगितले. त्यांना ती योजना पसंत पडली नकाशे वगैरे पाहून बेत पक्का करण्यात आला.

दरम्यान सिनोरी करोनी येऊन " चिंता करू नका. लवकरच व्यवस्था होईल." असा निरोप देऊन गेली. पण त्यावर विश्वास ठेवणे आता कठीण झाले होते. दरम्यान भगतराम व महाकीरच्याही गाठीभेटी झाल्या. दोन तीन दिवसांत काबूल सोडण्याची आशा निर्माण झाली. महाकीरच्या मागणीप्रमाणे सर्व व्यवस्था देखील करण्यात आली.

उत्तमचंद यांचा जीवनलाल नावाचा मित्र अतिशय चोंबडा होता. तो नेमका याच वेळी येऊन टपकला. पहिल्या भेटीत त्याने मुक्ताफळे उधळली. म्हणाला, "सुभाषबाबू पळून गेल्याचा इंग्रज खोटा प्रचार करीत आहेत. ते त्यांना तुरुंगात मारूनही टाकतील." जीवनलालचा सुकी फळे खरेदी करून विकण्याचा धंदा होता. तसा तो अशिक्षित होता. पण अतिशय वटवटया, नको तिथें नाक खुपसणारा, वृथा चौकशा करणारा असा होता. उत्तमचंदना त्याची एक डोकेदुखीच होऊन बसली.

एक दिवस ही स्वारी उत्तमचंदच्या दुकानी येऊन धडकली· त्याने दुकानांत ठाणच मांडले. दुकान बंद करून उत्तमचंद निघाले तरी तो त्यांचा पिच्छा सोडेना. त्यांच्या मागोमाग निघाला. उत्तमचंद म्हणाले, 'माझी बायको आजारी आहे. आज काही तुला मी जेवू घालू शकणार नाही.' तेव्हा मग त्याने उत्तमचंदचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी दुकानात महाकीर आला त्याच वेळी जीवनलालही उपटसुंभासारखा प्रगटला. त्या दोघांची ओळख होती म्हणून एक तासभर ते इकडच्या तिकडच्या गप्पा मारत बसले.

भगतराम आला. पण जीवनलाल सारख्या अनोळखी इसमाला पाहून त्याने चतुराईने उत्तमचंदना, 'अस्सलाम आलेकुम्' करून महाकीरला घेऊन तो निघून गेला. आता पेचप्रसंग उद्भवला. जीवनलाल खोदून खोदून भगतराम कोण व त्याचे महाकीरशी काय काम होते असे विचारू लागला. उत्तमचंदना त्याच्या रिकाम टेकडचा लुबरेपणाचा अत्यंत संताप आला. पण करणार काय ? महाकीर हा जुगारी असल्याचे जीवनलालला माहीत होते.

जीवनलालचा भडिमार असह्य झाल्यावर उत्तमचंद म्हणाले, 'तो माणूस कोण मला माहीत नाही. महाकीरचा एखादा मित्र असेल.' 'उत्तमचंद, तू या जुगाऱ्यांपासून सावध रहा,' नसत्या चुगलखोरपणाने जीवनलाल उपदेश करू लागला, 'तो अनोळखी माणूसही मला चेहऱ्यावरून जुगारीच वाटला. उत्तमचंद, तूं त्यांच्यापासून सावध रहा. नाही तर एक दिवस हे दोघे तुला गंडवतील हं !'

असा अनाहूत उपदेश करून जीवनलाल एकदाचा उत्तमचंदांच्या दुकानांतून टळला. त्याच दिवशी दुपारी भगतराम व महाकीर उत्तमचंदांच्या दुकानात आले. उत्तमचंद महाकीरला १०० रु. ची नोट देत असतानाच जीवनलाल अवतरला. उत्तमचंदना वाटले, आता या न सुटत्या कर्माला काय करावे ? त्या कोडग्या जीवनलालने महाकीरवर तोंडसुख घ्यायला सुरुवात करीत म्हणाला,

'उत्तमचंद, या जुगाऱ्यांच्या जाळ्यात सापडू नको म्हणून तुला सकाळीच बजावले होते ना ? पण तुझ्यावर त्याचा काहीच परिणाम नाही. अच्छा बाबा, कर तुला काय करायचय ते ! माझं मित्रकर्तव्य मी केलं.'

महाकीर व भगतराम जीवनलालचें बोलणे ऐकून खूप संतापले. आणि ताडकन् दुकानातून निघून गेले. ते गेल्यावर तर जीवनलालची जीभ आणखी सैल सुटली. उत्तमचंदची फारच पंचाईत झाली. भगतराम हा कोण आहे हे ते जीवनलालला कसे सांगू शकणार होते ? जीवनलाल दुकानाजवळच राहत होता. भगतराम त्याला पुन्हा दुकानात दिसण्याची शक्यता होती. 'स्वभावो दूरतिक्रमा' या प्रमाणे तो काबूलभर उत्तमचंद जुगाऱ्यांच्या नादी

लागला आहे असे बडबडला असता. शिवाय त्याची अन् 'क्ष' ची गाठ पडली तर सारेच ओंफस होणार होते. उत्तमचंद चांगलेच फेऱ्यात पडले.

जीवनलालच्या दुकानातल्या खेपा वाढल्या. विचारान्ती उत्तमचंदनी एक दिवस त्याला म्हटले,

"हे बघ जीवनलाल, महाकीर जुगारी आहे हे कबूल. पण त्याचा मित्र खरोखर फार चांगला आहे. अकारण त्याचा अपमान तू का केलास ?"

जीवनलालने उत्तमचंदना बरोबर शब्दात पकडून म्हटले, "अरे उत्तमचंद, परवा तर तू म्हणालास की तो नवखा कोण आहे मला माहीत नाही. अन् आता म्हणतोस की तो चांगला आहे. तुझ्या बोलण्यात बोल नाही. अन् काय रे, तूं त्यांना १०० रु. कशासाठी दिलेस ? काय गोंधळ आहे ते सांग पाहूं ?"

त्याच्या त्या चोंबडेपणाचा उत्तमचंदना खूप राग आला. चिडूनच ते म्हणाले,

"तो कोण आहे हे तुला सांगायची माझी इच्छा नाही. समजलं ! मी पैसे का दिले हेही मी सांगणार नाही."

त्यावर जीवनलाल काही काळ स्तब्ध राहला. मग म्हणाला,

"आजवर असं कधी तू वागला नव्हतास. इतका चिडून बोललास त्याअर्थी हे महारहस्य असलं पाहिजे."

उत्तमचंद ठासून म्हणाले, "होय. ते महारहस्यच आहे. त्याची वाच्यता केल्यानं माझं नुकसान होईल. शिवाय तुझा त्याच्याशी कांही संबधही नाही."

आतां जीवनलालची उत्सुकता जास्तच वाढली. न राहवून तो म्हणाला,

'उत्तमचंद, तुझं रहस्य मी फोडणार नाही. मला सांग. मी कधीही विश्वासघात करणार नाही.'

अगदी कंटाळून उत्तमचंद त्याला टाळायच्या हेतूने म्हणाले, 'बघू. मी विचार करून उद्या सांगतो.'

संध्याकाळी उत्तमचंदनी जीवनलालची माहिती व सर्व प्रकरण नेताजींना सांगितले. त्यावर ते म्हणाले,

'हा माणूस मूर्ख आणि दुबळा दिसतो. त्याला विश्वासात घेता कामा नये.'

उत्तमचंदनी प्रश्न केला, 'पण त्याला सांगणं जसं धोक्याचं आहे तसंच न सांगणंही धोक्याचंच आहे. फारच उचापत्या माणूस आहे तो. उगाच आग लावील.'

विचार करून सुभाषबाबू म्हणाले, 'दोन दिवसांनी मी गेल्या-वर मग काय सांगायचं ते सांग.'

दुसऱ्या दिवशी जीवनलालशी सामना झाल्यावर 'रहस्य सांगा' असा घोशाच त्याने लावला. तशी उत्तमचंद म्हणाले, 'अरे बाबा, तुला म्हटलं ना, माझी बायको फार आजारी आहे. मी अजून काही विचार केला नाही.'

जीवनलाल चडफडतच निघून गेला. अवघ्या दोन दिवसांनी नेताजी व भगतराम काबूल सोडणार होते. सर्व तयारी झाली होती. फक्त लॉरीमधल्या सीट्स तेवढ्या रिझर्व्ह करायच्या होत्या. त्या चिंतेत उत्तमचंद असताना जीवनलाल लुडबुडायला आला. त्याला पाहून उत्तमचंदाचे माथेच भडकले, 'हे बघ जीवनलाल,

"कृपा करून मला त्रास देऊ नकोस. केव्हा तरी मी तुला सांगीन म्हटलंय ना ? माझ्यावर विश्वास ठेव.'

दोघे बोलत असताना सिनोरा करोनी आली आणि तिने उत्तमचंदच्या हाती एक लखोटा दिला. तिचा आनंद पाहून उत्तमचंदना नवल वाटले. त्यांनी म्हटले, 'सर्व व्यवस्था झालेली दिसते ?'

सिनोरा करोनी गेल्यावर तर जीवनलालच्या जिज्ञासेने जसा पेट घेतला. त्याने उत्तमचंदची उलट तपासणी सुरू केली.

'तिने कसला लखोटा दिला तुला ?'

'काहीही दिले नाही,' उत्तमचंद कडाडले, 'तू झोपेत तर नाहीस ?'

'हे बघ मी झोपेत नाही. स्वप्नही पाहात नाही कीं दारूच्या नशेतही नाही,' प्रक्षुब्ध होऊन जीवनलाल म्हणाला, 'तुझे हल्ली उद्योग तरी काय चाललेत ? फारच रहस्यमय झाला आहेस.'

उत्तमचंदनी त्याला टोमणा मारत म्हटले, 'मी होतो तसाच आहे. तुझंच मस्तक भ्रमलेलं दिसतंय.'


एवढे बोलल्यानंतर जीवनलाल निघून गेला. तो गेल्यावर एवढा वेळ दाबून ठेवलेली जिज्ञासा उसळली. लखोटा फोडून उत्तमचंद वाचू लागले, 'आज रोमहून समाधानकारक पत्र आले आहे. रोमहून राजदूत निघाले आहेत. एका आठवड्याच्या आत ते येथे येऊन पोचतील. पासपोर्टसाठी तुमचा फोटो पाठवावा. त्यासाठी उद्या सकाळी 'दाराब पान' रस्त्यावर या. तिथे असलेल्या मोटारीत गुपचुप बसा. फोटो काढून झाल्यावर जेथे तुम्ही गाडीत बसलात तेथे तुम्हाला पोचवण्यात येईल. फोटोचे पैसे तुम्ही देऊ नका.'

त्याच वेळी महावीराने येऊन विचारले, 'तुमचा मित्र अजून आला नाही का ?'

'नाही हो ! तो आजारी पडल्याचं कळलंय. बहुदा एवढ्यात नाही यायचा तो.'

'मग कसं करायचं ? कारण उद्या जायचं तर आज सीट्स रिझर्व्ह करायलाच हव्यात. लॉऱ्या थोड्या व प्रवासी जास्त असं झालंय.' महावीर म्हणाला, 'जाऊ द्या. माझा मित्र बरा होऊन आल्यावर मगच बघू आता.' उत्तमचंद म्हणाले

□ □



# यशस्वी शेवट

सुभाषबाबूंनी पत्र वाचून उत्तमचंदना विचारले, ‘ इटालियन वकिलातीमार्फत जायचं की महाकीरबरोबर ?’

उत्तमचंदनी महाकीरबरोबर झालेले बोलणे सांगितले. त्यावर नेताजी उत्तरले, ‘ तुम्ही केलंत तेच बरोबर आहे. पण या साऱ्या प्रकरणात माझा इथला मुक्काम १०–१२ दिवस तरी वाढणारसं दिसतंय. ’

भगतराम मध्येच म्हणाला, ‘ तीन दिवस वाट बघू या. मग निश्चित करू काय करायचं ते !’

‘ सध्या माझ्यापुढं तर जीवनलालचा प्रश्नच आ वासून उभा आहे. त्यानं ते पत्र देताना पाह्यलंय व तेव्हापासून डोकं खातोय. त्याच्या महामूर्खपणामुळं काही संकट येऊ नये म्हणजे मिळवलं ’. उत्तमचंद चिंतेने म्हणाले.

‘ खरं तर त्याला विश्वासात घेणे योग्य नाही.’ नेताजी म्हणाले,

'पण अगदी अपरिहार्यच असेल तर तुम्हाला सुचेल तसे करा.'

दुसऱ्या दिवशी जीवनलाल दुकानात हजर झाला. त्याने विचारले 'तो दुसरा माणूस मी काल हिंदू गुजरीत पाह्यला. तो तुमच्या घरी आला होता काय ?'

उत्तमचंद तडकून म्हणाले. 'हे बघ हे सारं प्रकरण राजकीय आहे. नसती उठाठेव करू नकोस. तुला तुरुंगात जावं लागेल. अजागळपणानं कुठेतरी बडबडशील अन् तुझ्या बरोबर मलाही गजाआड घालशील.'

'प्राण गेला तरी बोलणार नाही. सांग मला काय रहस्य आहे ते !'

शेवटी नाइलाजाने उत्तमचंदनी त्याला सर्व वस्तुस्थिती सांगितली. जीवनलालची घबराट विलक्षण होती. पण धीर सावरून त्याने विचारले, 'मला त्यांचं दर्शन घडेल का ?'

'यासाठीच मी तुला काही सांगत नव्हतो.' उत्तमचंद म्हणाले, 'मी तुझ्याजवळ 'गुपित बोलल्याचं त्यांना कळलं तर माझ्यावर फार रागावतील ते !'

नेताजींचा फोटो काढण्याचे काम उरकल्यावर हाजीसाहेबांकडे चहाचा कार्यक्रम झाला.

पुन्हा एकदा उत्तमचंद, भगतराम व नेताजी यांनी महाकीर की इटालियन वकिलात याबाबत चर्चा केली. पण सुभाषबाबू ठामपणे म्हणाले, 'मला वाटतं रशियन वकिलातीला मी तिथं येणं नको आहे. तेव्हा जे 'या' म्हणताहेत तिथं जाणंच चांगलं. तिथून मी पुढचा प्रयत्न करीन.'

पासपोर्ट तयार झाला. शेवटी उत्तमचंदना जीवनलालचा हट्ट पुरवावा लागला. जीवनलालने नेताजींना फळे दिली. पुढेही तो

उत्तमचंदच्या घराला चिकटूनच बसला. नसतीच ब्याद निर्माण झाली. अर्थात त्याच्या चोंबडेपणाचे त्याला पुढे खूपच प्रायश्चित भोगावे लागले.

उत्तमचंदनी सुभाषबाबूंच्या प्रवासाची सर्व तयारी केली. दोन सूटस, सूटकेस वगैरे. इटालियन वकीलाने सूचना केली की नेताजींनी आपली सूटकेस उत्तमचंदच्या दुकानीं ठेवावी. तिथून एक माणूस ती घेऊन जाईल.

१८ मार्चला काबूल सोडायचे ठरले. १७ मार्चला सिनॉर करोनींच्या घरी रात्रीचे जेवण करून निघायचे होते.

उत्तमचंदचा निरोप घेताना नेताजी अगदी हेलावले. म्हणाले, 'तुमच्या धाकटचा मुलीवर मी फार रागालोय. जेवताना ती आपल्या थाळीतले पावाचे तुकडे माझ्या ताटात टाकी. मला पाच तुकडे खायला लावी.'

रामोदेवींचाही नेताजींनी निरोप घेतला. उत्तमचंद नेताजींच्या पायाला हात लावून म्हणाले, 'माझ्याकडून काही चुकलं असेल तर मला क्षमा करा.'

नेताजींनी उत्तमचंदच्या पाठीवर थोपटले. महाकीरवर झालेला खर्च वाया गेला तरी दुःख कुणालाच वाटले नाही.

घरातून निघताना सुभाषबाबूंनी मुलांना उचलून त्यांचे मुके घेतले. रामोदेवींच्या हातची शेवटची न्याहारी घेतली व सर्वांचा निरोप घेऊन काहीशा जड परंतु आशायुक्त अंतःकरणाने सुभाषबाबू निघाले. दिवसभर हाजीसाहेबांकडे त्यांनी मुक्काम केला. तेथून निघताना आपली फेझ टोपी उत्तचंदांना देऊन 'काराकाली' टोपी डोक्यावर चढवली. सुभाषबाबूंनी उत्तमचंदना उद्देशून शेवटचे शब्द उच्चारले,

'जपून वागा. बर्लिनला पोचल्याबरोबर तुम्हाला कळवतो.'

त्याआधी सर्वजण मोटारने रशियन सरहद्दीच्या दिशेने निघाले. वाटेत 'पुल खुमारी'ला मुक्काम केला. काबूल व रशियन सरहद्दीच्या मध्यावर हे गाव आहे. दुसऱ्या दिवशी अफगाण सरहद्द ओलांडून गाडी रशियन हद्दीत पोचली.

२० मार्चला नेताजी रेल्वेने मॉस्कोला पोचले. तेथे ८ दिवस त्यांनी आराम केला. त्यानंतर भगतरामनी त्यांचा निरोप घेतला. सुभाषबाबूंसाठी मॉस्कोत विमान तयार होते. त्या विमानात २८ मार्चला त्यांनी पाऊल ठेवले व त्याच दिवशी सायंकाळी जर्मनीची राजधानी बर्लिनच्या भूमीवर त्यांनी पाय ठेवला. जर्मन मासिकात ही बातमी झळकली ती अशी–

'भारताचे महान नेते आणि इंडियन नॅशनल काँग्रेसचे भूतपूर्व अध्यक्ष सुभाषचंद्र बोस हे काही दिवसांपूर्वी भारतातून रहस्यपूर्णरितीने अदृश्य झाले होते. ते २८ मार्च रोजी बर्लिनला सुखरूप पोचले.'

काबूलमधून सुभाषचंद्र बोस निघून गेल्यानंतर काही दिवसांनी इंग्रज सरकारला कळले की ते काबूलमध्ये एका हिंदूच्या घरी मुक्काम ठोकून होते. ब्रिटिशांचा गुप्त हेर बशीसाहेब याने उत्तमचदना गाठून विचारले,

'सुभाषबाबू कोणाच्या घरी राहात होते? त्यांचं काही तुम्हाला माहीत आहे का?'

उत्तमचंदनी नाटक वठवले, 'कोण? सुभाषबाबू? ते काबूलमध्ये आलेत? कुठं आहेत ते? मला सांगा ना! त्यांच्या दर्शनासाठी माझा जीव अगदी तळमळतोय हो!'

बशीसाहेबांना भगतरामचा तलास लागला. अर्थात् सुभाष

बाबूंनी काबूल सोडल्यावर हे सर्व घडले हे केवढे मोठे भाग्य ! उत्तमचंदना त्याचेच समाधान वाटले.

पुढे जून १९४१ मध्ये उत्तमचंदना सुभाषबाबूंचे पत्र मिळाले, 'उत्तमचद, नमस्ते. तुम्ही माझ्यासाठी जे केलें त्यावद्दल मी तुमचा ऋणी आहे. आयुष्यभर तें मी कधीच विसरणार नाही–सुभाष.'

नंतर इंग्रज सरकारच्या सूचनेवरून अफगाण सरकारने उत्तमचंदना पकडून स्थानबद्ध केले. जीवनलाललाही खूप घाबरवून सोडले. तो भारतांत पळाला. पण तेथे पोलिस त्याची जणू वाटच पाहात होते. त्यांनी त्याला स्थानबद्ध करून तुरुंगात ठेवले.

सुभाषबाबू मॉस्कोला रवाना झाल्यावर भगतराम तडक कलकत्त्याला गेले आणि त्यांनी शरतबाबू व शिशिरला सर्व हकीगत सांगितली. त्यामागोमाग कलकत्त्यातील जपानच्या काऊन्सल जनरलने सुभाषबाबू बर्लिनला सुखरूप पोचल्याची बातमी दिली. त्यानंतर खुद्द सुभाषबाबूंकडून आपण बर्लिनमध्ये सुखरूप असल्याचा संदेश जपानमार्फत आला.


शरतबाबूंना आधीच पकडले होते. सुभाषबाबूंच्या निसटण्यानंतर शिशिर बोसलाही गिरफ्तार करून लाहोरच्या तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले.

□ □

---

शिशिर बोस यांचें 'द ग्रेट एस्केप' व उत्तमचंद याचे 'व्हेन बोस वॉज जियाउद्दिन' या दोन पुस्तकांतील अधिकृत माहितीच्या आधारे हें पुस्तक लिहिलें आहे.

सुभाषबाबू निसटले
क्र. २०७७ दिनांक ११।१।८८



बर्लिनमध्यें सुभाषबा[illegible]

BVBK-0402077

। ७६ । सुभाषबाबू नि[illegible]

# स्वातंत्र्य-कथा

## सुभाषबाबू निसटले

सुभाषचंद्र बोस कलकत्त्यातील आपल्या निवासस्थानातून अदृष्य झाले अशी बातमी २६ जानेवारी, १९४१ ला सर्व भारतीय वृत्तपत्रांत ठळकपणें प्रसिद्ध झाली.

कडेकोट नजरबंदीत ठेवलेला हा बंडखोर नेता कुठे पसार झाला असेल ? ब्रिटिश सरकार हादरले. भारतीय स्वातंत्र्यवादी जनता परस्परात चर्चा करू लागली, सुभाषबाबू कुठें गेले असतील? कसे गेले असतील ? कशासाठी गेले असतील ?

पण आपल्या लाडक्या सुभाषबाबूंचे अंत:करण जनतेला माहित होते. स्वातंत्र्याच्या आपल्या महान ध्येयाच्या सिद्धीसाठी सुभाष पसार झाले आहेत अशी जनतेच्या अंतर्मनाने ग्वाही दिली.

आणि मार्च, १९४१ मध्ये जर्मन वृत्तपत्रांनी बातमी प्रसिद्ध केली, "कांही दिवसांपूर्वी हिंदुस्थानातून अकस्मात अंतर्धान पावलेले हिंदुस्थानचे महान नेते व हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचे भूतपूर्व अध्यक्ष सुभाषचंद्र बोस २८ मार्च रोजी बर्लिन येथे सुखरूप पोचले."

सुभाषबाबूंच्या गुप्त देशांतराची ही रोमांचक सत्यकथा.

**किंमत १० रु.**

छपाई के. जोशी ॲण्ड को. पुणे ४११

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : व्रा. वा.
दा. क्र. : २०७८

# सुभाषबाबू निसटले





BVBK-0402077

– श्रीपाद केळकर